अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

अफगणिस्तानचा श्रीलंकेवर ७ गडी राखून ऐतिहासिक विजय

लखनौ : विश्वचषकाच्या ३०व्या अफगाणिस्तानने श्रीलंकेला सात गडी राखून धूळ चारत ऐतिहासिक विजय मिळवला. अफगाणी संघाच्या विजयाने श्रीलंकेच्या उपांत्य फेरीत पोहचण्याचा मार्ग खडतर झाला आहे.

विश्वचषक २०२३मधील अफगाणिस्तान संघाचा हा तिसरा विजय आहे. याआधी त्यांनी इंग्लंड आणि पाकिस्तानला मात दिली होती. अफगाणिस्तानच्या अप्रतिम फिरकी गोलंदाजीने श्रीलंकेला अवघ्या २४१ धावांत रोखले आणि रहमत शाहने तुफानी अर्धशतकी खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. त्यांच्या विजयाने गुणतालिकेत मोठा फेरबदल झाला आहे. एकदिवसीय विश्वचषक २०२३च्या सामन्यात अफगाणिस्तानने श्रीलंकेचा पराभव केला आहे. पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २४१ धावा केल्या आणि अफगाणिस्तानने तीन गडी गमावून लक्ष्य गाठले. या पराभवामुळे श्रीलंकेचा पुढचा मार्ग कठीण झाला आहे. त्याचबरोबर इंग्लंड आणि पाकिस्तानंतर अफगाणिस्तानेही श्रीलंकेचा पराभव केला आहे. अफगाणिस्तानने श्रीलंकेचा सात गडी राखून पराभव केला आहे. या विश्वचषकात अफगाणिस्तानचा हा तिसरा विजय आहे. यापूर्वी या संघाने इंग्लंड आणि पाकिस्तानला पराभूत करून अस्वस्थता निर्माण केली होती. आता अफगाणिस्तान संघ सहा गुणांसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. त्याचवेळी श्रीलंकेसाठी उपांत्य फेरीचा मार्ग कठीण झाला आहे. फजलहक फारुकीला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ३३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

मराठा समाज आरक्षणाचा तिढा कायम | राज्यभर वणवा!

सोलापुरातील अक्कलकोट रस्त्यावर टायर जाळले..! राष्ट्रीय छावा संघटनेच्यावतीने अक्कलकोट रस्त्यावर मराठा समाज बांधवांनी जरांगे-पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी रस्त्यावरच टायर जाळून आंदोलन करण्यात आले. रात्री अचनक झालेल्या आंदोलनामुळे एकच धावपळ उडाली. सर्वत्र रस्त्यावर धूर आणि आगच, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे सोलापूर-अक्कलकोट रस्ता चक्का जाम झाला होता. या आंदोलनात संजय पारवे, बबलू घाडगे, नागेश घोरपडे, विष्णू माने, विठ्ठल जगताप, सोमनाथ पवार, भरत करणे, ज्ञानेश्वर पवार, ज्ञानेश्वर खैरे, सुरज घदुरे, सोन्या शिंदे, लक्ष्मण खटके, सोमनाथ जाधव, नितीन चव्हाण, राहुल मोरे, लखन पवार आदी सहभागी झाले होते. जर आरक्षणाचा निर्णय लवकर झाला नाही तर आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा छाव संघटनेचे नागेश घोरपडे यांनी दिला.

वेळापुरात तरुण चढले टॉवरवर!

वेळापूर : मनोज जरांगे- पाटलांच्या मराठा आरक्षणासाठी सुरू केलेल्या आमरण उपोषणाच्या सहाव्या दिवशी वेळापुरातील सात तरुणांनी बीएसएनएलच्या टॉवरवर चढून जरांगे पाटलांनी उपोषणादरम्यान पाणी घ्यावे म्हणून आर्जव करीत साकडे घातले. टीव्हीवरील मनोज जरांगे-पाटील यांचे उपोषणादरम्यान झालेली क्षीण अवस्था पाहून अस्वस्थ झालेले राहुल कोडग, सचिन माने-देशमुख, लक्ष्मण माने-देशमुख, अतुल मोहिते, शिवराज माने-देशमुख, संग्राम मगर, बबलू जाधव या तरुणांनी येथील पालखी चौकातील बीएसएनएलच्या टॉवरवर चढून साकडे घातले.समन्वय समिती सदस्य सरपंच कटारे यांनी फोनवरून तरुणांना समजविण्याचा प्रयत्न झाल्यानंतरही तरुण मागणीवर ठाम राहिले होते.

सुराज्य/सोलापूर

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी जालना जिल्ह्यातील आंतरवली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ सोलापुरातही सुरू असलेला आंदोलनाचा वणवा सोमवारी शहर व जिल्ह्यात चांगलाच पेटला. मराठा आरक्षणाविरोधात बोलणाऱ्या प्रताप कांचन या युवकाच्या अंगावर मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी ऑईल फेकून त्याला उठाबशा करायला लावल्या. दुसरीकडे शिक्षकांच्या प्रश्नावर बैठक घेण्यासाठी जिल्हा परिषदेत आलेले कोकणातील शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना हुसकावून लावले. सोलापूर अक्कलकोट रोडवर छावा संघटनेच्यावतीने टायर जाळत चक्का जाम केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पोस्टरला काळे फासले

उत्तर सोलापूरः उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी येथे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी समाज बांधवांनी आंदोलन सुरु केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून येथभल मराठा समाजातील आंदोलनकर्त्यांनी येथील पेट्रोल पंपावरील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेला काळे फासले. परिवहन महा मंडळाच्या बसेसवर असणाऱ्या राज्य शासनाच्या जाहिरातीवरील पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेला काळे फासले.

आमदार म्हात्रेंना शहरातून हुसकावून लावले

शहरात मराठा आंदोलन चालू आहे. लोकप्रतिनिधींना शहरात बंदी घालण्यात आली आहे. तरीदेखील बैठकीसाठी आलेल्या भाजपाचे कोकणातील शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना सोमवारी सोलापुरात चांगला दणका बसला. शासकीय विश्रामगृहात बैठक चालू असताना मराठा समाजाने बैठक उधळून लावत त्यांना बाहेर काढले.

आरक्षणाला विरोध करणाऱ्याला काळे फासले

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यायला विरोध करणारे प्रताप कांचन यांना मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राम जाधव, योगेश पवार यांनी जाब विचारत त्यांच्या अंगावर ऑईल ओतून समाजाची माफी मागायला लावली. यावेळी प्रताप कांचन यांनी मराठा समाजाची माफी मागितली. याप्रसंगी रतिकांत पाटील, ओंकार लोखंडे, किरण वाघमारे आदी समाजबांधव उपस्थित होते.

कर्देहळ्ळीत नेत्यांना गावबंदी अन् उपोषण : दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथे मराठा समाजाच्यावतीने राजकीय नेत्यांना गावबंदी करण्याचा निर्णय घेऊन सोमवारपासून साखळी उपोषणाला सुरूवात केली आहे. कृष्णात पवार, संजय जाधव या युवकांनी आमरण तर ग्रामस्थांनी साखळी उपोषण सुरू केले आहे. पहिल्या दिवशी या उपोषणात महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गावच्या प्रवेशद्वारात नेत्यांना गावबंदी केल्याचा फलकही लावण्यात आला आहे.

दरम्यान आमदार म्हात्रे पुन्हा दुपारी बाराच्या सुमारास जिल्हा परिषदेमध्ये बैठक येत असल्याची कूणकूण लागताच मराठा समाजाच्यावतीने बैठकीच्या ठिकाणी जाऊन चले जाओ... चले जाओ, अशा घोषणा देत त्यांना शहरातून बाहेर काढले. आंदोलनाचा विषय पेटलेला असताना भाजपाचे कोकणातील शिक्षक आ.ज्ञानेश्वर म्हात्रे हे सोमवारी सोलापुरात आले. शासकीय विश्रामगृहातील बैठक समाजबांधवांनी उधळवून लावली. परता जावा ... परत जावा.. एक मराठा लाख मराठा... अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. यावेळी राजन जाधव,विनोद भोसले, गणेश डोंगरे, ज्ञानेश्वर सपाटे, गणेश देशमुख हे अतिशय आक्रमक दिसून आले. शेवटी आंदोलनकर्त्यांचा रोष, आक्रमकता पाहून त्यांनी पोलीस बंदोबस्तामध्ये झेडपी बाहेर पडणे पसंत केले.

मिरवणुकीत फुले उधळताना भिंत ढासळल्याने महिलेसह सातजण जखमी

नीलमनगर येथील घटना

सुराज्य/सोलापूर

देवीच्या छबिना मिरवणुकीवेळी धाब्यावरून फुले फेकत असताना धाब्याची भिंत ढासळून कोसळल्याने खाली थांबलेल्या महिलेसह सातजण जखमी झाले.

ही घटना शहरातील नीलम नगर भाग-२ येथील नवदुर्गा मंदिराजवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यापैकी पाच जणांना शासकीय रुग्णालय तर अन्य दोघांना खाजगी रुग्णालयात दाखल केले.

सत्यम गोपाळ मच्छा (वय-५९), प्रवलिका रमेश गोरट्याल (वय-१२), गौरी दिनेश वीटकर (वय-१२), पल्लवी केशव गुंडला (वय-१२), अमृता चंद्रकांत गोरट्याल (वय-१२ नीलम नगर, एमआयडीसी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. नीलमनगर भाग-२ येथे नवदुर्गा मंदिराजवळ देवीची छबिना मिरवणूक निघाली होती. त्यावेळी मंदिराच्या गाळ्यावर असलेल्या गच्चीवरून काही ण मिरवणुकीवर फुले उधळत होती.

त्यावेळी एका भागाची भिंत अचानक ढासळली. त्याच्या अजोरा खाली कोसळल्याने मिरवणुक पाहण्यासाठी थांबलेले महिलेसह सात जण जखमी झाले.या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

मंत्रीचंडक पार्क येथे अठरा लाखांची घरफोडी

सुराज्य/सोलापूर

विजयपूर रोड येथील मंत्रीचंडक पार्क येथे सर्वात मोठी घरफोडी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी हुसेन बाशा चाँदसाह शेख (वय-६३, मंत्रीचंडक पार्क, विजयपूर रोड) यांनी विजयपूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

हुसेनबाशा शेख हे नई जिंदगी येथे मुलाच्या घरी गेले होते. त्यांची पत्नी व सून माहेरी गेल्या होत्या. त्यावेळी चोरट्याने फिर्यादी यांच्या घराच्या पाठीमागील बाजूस स्वयंपाक घराचे दार तोडून आत प्रवेश केला.

त्यानंतर बेडरूममध्ये असलेल्या लाकडी कपाटा मध्ये ठेवलेली बारा लाखांची रोकड व सोन्या-चांदीचे दागिने असा मिळून एकूण १७ लाख ८९ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या घटनेचा अधिक तपास पो.स.ई. गायकवाड हे करीत आहेत.

होलसेल मेडिकल व्यवसायासाठी लोन देतो म्हणून २८ लाखांची फसवणूक

पती-पत्नीवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

होलसेल मेडिकल व्यवसायासाठी लोन देतो म्हणून कमिशन स्वरूपात २८ लाख रुपये घेऊन परत न करता विश्वासघात करून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी पती-पत्नीविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

गणेश पुंडलिक भापकर, तेजल भापकर (दौंड,पुणे) असे गुन्हा दाखल केलेल्या पती-पत्नीचे नाव आहे. याप्रकरणी प्रिया अप्पासाहेब बसवंती (वय-४०, पश्चिम मंगळवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादीने मार्च २०२० मध्ये अस्पदा फायनान्शियल सर्व्हिस रिजनल डिव्हीजन ऑफिस सिटी प्राईडजवळ सातारा रोड, बेबेवाडी पुणे येथे गणेश व तेजल यांची भेट घेतली. दरम्यान, त्यांनी ३ कोटी ५० लाख रुपये लोन प्रायव्हेट फायनान्स कंपनीकडून तीन आठवड्यात मंजूर करून देण्यासाठी कमिशन म्हणून वेळोवेळी २८ लाख रुपये घेतले. त्यानंतर त्यांची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले. तपास मपोसई व्हट्टे या करित आहे.

दिरासह भावजयीला चुना; अडीच लाखांना फसवले

सुराज्य/सोलापूर

दिरासह भावजयीला फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या दोन वेगवेगळ्या घटनेतील पहिली घटना दि. १ मार्च २०२३ रोजी तर दुसरी घटना दि.३० ऑक्टोबर रोजी घडली.

याप्रकरणी प्रकाश भारतभूषण आरशीद (वय-३९, पूर्व मंगळवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून मिक्कीसिंग नावाचा अनोळखी व्यक्ती व कुलदीपसिंग ऊर्फ सरबजीतसिंग होरा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आरशीद यांचा प्रकाश सेल्स कॉर्पोरेशन या नावाचे फर्म असलेला घाऊक तेल विक्रीचा व्यवसाय आहे. प्रकाश यांची भावजय शैला यांचा अंश ट्रेड सर्व्हीस नावाचा फर्म आहे. फिर्यादींना (८५३०३०४३८०) यावरून फोन आला. त्यावेळी मिकिसिंगने १५० कीर्ती गोल्ड सोयाबीन तेलाचे बॉक्स गुरुद्वार गुरुनानक दरबार अंत्रोळीकर नगर येथे पाठविण्यास सांगितले. त्यावेळी संशयित आरोपीने कामगारांना स्वीस बँकेचा १ लाख ९५ हजार २५७ रुपयांचा चेक दिला. उर्वरित रक्कम ९ हजार ७६३ रुपये ही ऑनलाईन पाठवल्याबाबत सक्सेस मेसेजचा स्क्रीन शॉट हा कामगारांना दाखवून कामगार दुकानात परतले. दरम्यान, त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, फिर्यादीची भावजय शैला यांचीदेखील कुलदीपसिंग ने ८३ हजार ५७५ रुपयांना गंडा घातला.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



वेळ सगळ्यांवर येते !

कल्याण
479-04-158

मुंबई
348-50-578

वेळापत्रक धुडकावून कोर्टाने नार्वेकरांना झापले

सुराज्य/मुंबई

आमदार अपात्रतेप्रकरणी आम्ही निकाल देऊन (११ मे) इतके दिवस झाले आहेत, तरी तुम्ही अद्याप कोणताही निर्णय का घेतला नाही? असा प्रश्न उपस्थित करत सरन्यायाधीशांनी राहुल नार्वेकर यांना सोमवारच्या सुनावणीत झापले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या गटातील १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घेण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांवर सोपवली आहे. परंतु, यासंबंधीची कार्यवाही करण्यास महाराष्ट्राच्या विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर दिरंगाई करत असल्याने शिवसेनेच्या ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील आमदारांच्या अपात्रतेचा निर्णयदेखील विधानसभा अध्यक्ष घेणार आहेत. परंतु, याबाबतच्या सुनावणीतही विधानसभा अध्यक्ष वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप शिवसेनेच्या ठाकरे गटाने आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने केला आहे. याप्रकरणी दोन्ही पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर (३० ऑक्टोबर) सुनावणी झाली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने यावर सुनावणी घेतली.

न्यायालयात झालेल्या सुनावणीवेळी सरन्यायाधीशांनी विधानसभेच्या अध्यक्षांना शिवसेनेच्या आमदार अपात्रतेचा निर्णय ३१ डिसेंबरपूर्वी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रतेचा निर्णय ३१ जानेवारीआधी घ्या, असे निर्देश दिले आहेत. दरम्यान, आमदार अपात्रतेप्रकरणी होणाऱ्या दिरंगाईबद्दल सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक्त केली. तसेच सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले, विधानसभा अध्यक्ष एवढा वेळ लावणार असतील तर आम्हाला आमदारांच्या पात्रता किंवा अपात्रतेचा निर्णय घ्यावा लागेल, अशी वेळ आमच्यावर येऊ देऊ नका. सर्वोच्च न्यायालयाचे वकील सिद्धार्थ शिंदे यांनी आज झालेल्या सुनावणीचा संपूर्ण घटनाक्रम सांगितला. सिद्धार्थ शिंदे म्हणाले, सरन्यायाधीशांनी शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेबाबतचा निर्णय ३१ डिसेंबरआधी घेण्याचे निर्देश दिले आहेत. तर अजित पवार आणि नऊ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय ३१ जानेवारीपूर्वी घेण्याचे निर्देश दिले आहेत. सरन्यायाधीश म्हणाले नार्वेकर एवढा वेळ लावणार असतील तर अशी वेळ येऊ देऊ नका की, आम्हालाच पात्रता किंवा अपात्रतेचा निर्णय घ्यावा लागेल. ठाकरे गटाची याचिका दिड वर्ष जुनी असल्याने आधी त्याबाबत निर्णय घ्यावा आणि एका महिन्यात राष्ट्रवादीच्या याचिकेवर निर्णय घ्यावा, अस न्यायालयाने म्हटलं आहे.

‘पीएमएलए’चा संभ्रम

काळा पैसा प्रतिबंधक कायद्यातील (पीएमएलए) तरतुदी जाचक व कठोर असल्याच्या आरोपाची धार तीन न्यायाधीशांच्या जुलै २०२२ मधील निर्णयामुळे बोथट झाली होती. परंतु याच निर्णयाला आव्हान देणाऱ्या दोनशेहून अधिक याचिकांच्या सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या अन्य खंडपीठाने फेरतपासणी करण्यास मान्यता दिली. एका खंडपीठाने निर्णय दिल्यानंतर तितक्याच न्यायाधीशांच्या दुसऱ्या खंडपीठाकडून फेरतपासणीचा आदेश होत नाही. त्यामुळे या निर्णयामुळे वेगळा पायंडा पडेल, अशी भीती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी वर्तविली असली तरी त्याकडे सर्वोच्च न्यायालयाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. या कायद्यातील तरतुदी कठोर व अन्यायकारक असून ही तपास यंत्रणा मनमानी व विशिष्ट हेतू ठेवून कारभार करीत असल्याची टीका वेळोवेळी झाली. या पार्श्वभूमीवर जुलै २०२२ मध्ये तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सविस्तर निकाल देत या कायद्यातील तरतुदींची घटनात्मक वैधता मान्य केली. याचा फेरविचार व्हावा यासाठी सर्वोच्च न्यायालयापुढे दोनशेच्या आसपास याचिका दाखल झाल्या आहेत. या याचिकांवरील सुनावणीच्या वेळी देशाचे महान्यायअभिकर्ता (सॉलिसिटर जनरल) तुषार मेहता यांनी पीएमएल कायद्यातील तरतुदींप्रकरणी जुलै २०२२ मध्ये तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सविस्तर निकाल देत त्या मान्य केल्या आहेत. अशा वेळी या तरतुदी कठोर वा अयोग्य असल्याच्या युक्तिवादाबाबत पुन्हा तीन न्यायाधीशांनी फेरसुनावणी घेणे म्हणजे वेगळा पायंडा पडेल, असा दावा केला. मात्र न्या. एस. के. कौल, न्या. संजीव खन्ना आणि न्या. बेला त्रिवेदी यांच्या खंडपीठाने म्हटले की, या मागणीत तथ्य न आढळल्यास याचिका फेटाळता येतील. याबाबत निर्णय व्हावा असे वाटत असल्यास आणखी मोठ्या खंडपीठाकडे हे प्रकरण वर्ग करता येईल, असे मत नोंदविले. त्यामुळे

आता या कायद्याची पुन्हा एकदा फेरतपासणी होणार का, हे लवकरच स्पष्ट होणार आहे. या कायद्याची पूर्वलक्ष्यी प्रभावाने अंमलबजावणी करता येऊ शकते का, जामीन देण्याबाबत जाचक अटी, सक्तवसुली संचालनालयाने दाखल केलेल्या गुन्ह्याबाबतची प्रत उपलब्ध करून न देणे आदी मुद्द्यांची फेरतपासणी होईल, असे जाणकार सांगतात. पीएमएल कायद्यातील जाचक तरतुदींविरोधात विविध राज्यातील न्यायालयांनी प्रतिकूल मत व्यक्त केले आहे. अशाच एका प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदवलेले निरीक्षण सक्तवसुली संचालनालयाच्या एककल्ली कारभारावर ताशेरे ओढणारे आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, एखाद्या व्यक्तीविरुद्ध कारवाई केल्यानंतर ती व्यक्ती अन्य कायद्यानुसार नव्हे तर पीएमएल कायद्यानुसार दोषी आहे याची संबंधित अधिकाऱ्यांना खात्री हवी. पीएमएल कायद्याअंतर्गत ती व्यक्ती कशी दोषी आहे हे लिखित स्वरूपात द्यायला हवे व आरोप सिद्ध होतील असे पुरावे सादर करायला हवेत. सर्वोच्च न्यायालयाने जुलै २०२२ मध्ये या कायद्यातील तरतुदींची घटनात्मक वैधता मान्य केल्यानंतरही उच्च न्यायालये असे मत व्यक्त करीत असल्यामुळे या कायद्याबाबत संदिग्धता निर्माण झाली आहे. २००५ मध्ये लागू झालेल्या पीएमएल कायद्याचा २०१४ ते आतापर्यंतच्या काळातच प्रभावी वापर करण्यात आला आहे. केंद्रात भाजप सत्तेवर आल्यानंतरचा हा काळ आहे. त्याआधी सक्तवसुली संचालनालयाने २००४-०५ ते २०१३-१४ या काळात फक्त ११२ छापे घातले, तर २०१४ ते २०२२ या काळात ३०१० छापे घालण्यात आले. आतापर्यंत दाखल ५९०० प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने चौकशी सुरू केली आहे. त्यापैकी ११०० प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कायद्यातील अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर आतापर्यंत १७ वर्षांत फक्त २४ प्रकरणांत दोषसिद्धी झाली आहे. केवळ भाजपविरोधी पक्षाच्या भ्रष्ट राजकारण्यांविरुद्ध सर्वाधिक कारवाई केल्यामुळेच सक्तवसुली संचालनालयावर आरोप झाले. जुलै २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात फेरतपासणी करण्याचा निर्णय जाहीर केल्यामुळे त्याचा फटका देशांतील विविध न्यायालयात पीएमएल कायद्यांतर्गत सुरू असलेल्या खटल्यांना बसू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या फेरतपासणीच्या निर्णयाचा आधार घेऊन आरोपींकडून सवलत घेतली जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पीएमएल कायद्यातील तरतुदींबाबत फेरतपासणी होत असल्यास ती प्रक्रिया लवकर पूर्ण करून या कायद्याबाबत असलेला भ्रम दूर करावा, अशी मागणीही केली जात आहे. त्यामुळेच पुन्हा होणाऱ्या फेरतपासणीस महत्त्व प्राप्त झाले आहे.

सामाजिक

स्त्रियांचे आत्मभान आणि थेरीगाथा

‘थेरीगाथा’ म्हणजे बौद्ध भिक्षुणींच्या वचन आणि उद्गारांचा दस्तऐवज. ‘थेर’ या शब्दाचा अर्थ स्थविर. बौद्ध भिक्षूंना स्थविर किंवा थेर म्हणतात. भिक्षुणी म्हणजे थेरी. आपण आपल्या दैनंदिन भाषेत म्हाताऱ्या लोकांना थेरडा किंवा थेरडी म्हणतो. खरं म्हणजे असं म्हणणं चुकीचं आहे. कारण थेर किंवा थेरी या शब्दाचा अर्थ थोर, ज्येष्ठ, मोठे असा आहे. फक्त वयाने अथवा शरीराने मोठे नव्हे तर ज्ञान आणि अनुभवाने श्रेष्ठ. आपण मात्र अपभ्रंश होऊन झालेले शब्द तुच्छता-क्रोध-हेटाळणी व्यक्त करण्यासाठी वापरतो.

‘थेरीगाथा’मध्ये बुद्धकालीन भिक्षुणींचे जीवनानुभव वर्णिले आहेत. श्रमण परंपरेत भिक्षू म्हणजे गृहत्याग केलेले पुरुष, तर भिक्षुणी म्हणजे गृहत्याग केलेली स्त्री. गृहत्याग केल्यावर धम्मात स्थिर झालेली भिक्षुणी म्हणजे ‘थेरी’. भिक्षुणी झाल्यानंतर सलग १० वर्षांचा कालावधी संपल्यावर भिक्षुणीला ‘थेरी’ असं म्हटलं जातं. थेरी भिक्षुणी संघातली वरिष्ठ आणि आदरणीय स्त्री होती. कौटुंबिक आयुष्य आणि भिक्षुणी होण्यामागील कारणमीमांसेपासून तर दुःखमुक्तीच्या वाटचालीचे स्वानुभव थेरीगाथेत मांडले आहेत. तत्कालीन लोकजीवन, स्त्रियांची सामाजिक स्थिती, कुटुंब संरचना, अर्थव्यवस्था, धार्मिक प्रथा, परंपरा यांसारख्या अनेक गोष्टींचा अंतर्भाव थेरीगाथेत असल्याने हा ग्रंथ अमूल्य आहे. यातून प्रत्ययास येणारा ‘स्त्रीवाद’ हा भारतीय स्त्रीमुक्तीचा आद्य हुंकार म्हणता येईल.

तथागत बुद्ध स्त्रीमुक्तीचे प्रणेते होते. त्यांनी स्त्रीमुक्तीचा पुरस्कार केला. ज्या काळात स्त्रिया अनेक बंधनांमध्ये जखडलेल्या होत्या त्या काळात स्त्रियांसाठी ‘भिक्षुणी संघ’ निर्माण करून त्यांना हरेक प्रकारचं स्वातंत्र्य देण्याचं क्रांतिकारक पाऊल बुद्धाने उचललं. यामध्ये सर्व स्तरातल्या स्त्रिया सहभागी होऊन प्रज्वलित झाल्या. बुद्धाने स्त्रियांना भिक्षुणी व्हायला होकार दिला ही भारतीय इतिहासातली क्रांतिकारक घटना होय. त्याकाळी स्त्रियांना अशुभ आणि हीन लेखून त्यांची अवहेलना केली जायची. स्त्रियांच्या संघप्रवेशामुळे त्यांना सामाजिक व धार्मिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. थेरीगाथा हा नैतिकता आणि शीलाचरणाचा उत्कृष्ट दस्तऐवज आहे.

थेरीगाथेतील ‘स्त्रियांचे भावविश्व आणि आधुनिक मानसशास्त्र’ या लेखात डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी थेरीगाथेतल्या स्त्रियांच्या मनोवस्थेबद्दल आधुनिक मानसशास्त्रातल्या निवडक उपपत्ती आणि संशोधनाच्या माध्यमातून चर्चा केलीय. त्यांनी braham Maslow, Bomister Roy, Ibert Elis, Sigmund Freud, Roy Baumeister या विश्वविख्यात मानस शास्त्रज्ञांनी मांडलेल्या सिद्धांतांच्या आधारे केलेली मांडणी महत्त्वपूर्ण आहे. आजच्या काळातल्या स्त्रियांच्या समस्या या थेरीगाथेतल्या स्त्रियांच्या समस्यांपेक्षा वेगळ्या आहेतच, पण तत्कालीन स्त्री जीवन आजपेक्षा फार खडतर होतं हे नक्की.

डॉ. श्यामल गरुड यांनी थेरी गाथेच्या ‘सहोदरी आंबेडकरी स्त्री आत्मकथा’ या प्रकरणात आंबेडकरी स्त्री आत्मकथनं व थेरीगाथेतल्या स्त्रियांची आत्मकथनं यातल्या साम्यस्थळांचा अभ्यासपूर्ण वेध घेतलाय. आपल्या विवेचनात त्यांनी जिणं आमचं (बेबीताई कांबळे), अंत:स्फोट (कुमुद पावडे), मिटलेली कवाडे (मुक्ता सर्वगौड), रात्रंदिन आम्हा (शांताबाई दाणी), आयदान (ऊर्मीला पवार), माझे मी (यशोधराबाई गायकवाड), सांगायची गोष्ट (हिरा पवार), सत्यशोधकांची वारस (नलिनीबाई लढके) या आत्मचरित्रांमधून आढळणारं स्त्री जीवन दु:खमुक्तीसाठी झगडणाऱ्या थेरींच्या अनुभवांशी साधर्म्य दर्शवणारं असल्याचं प्रतिपादन केलंय. त्यांची थेरीगाथा व आंबेडकरी स्त्री आत्मचरित्र हे सहोदरी कसे याची मांडणी उद्बोधक नि विचारप्रवर्तक आहे.

प्रा. आशालता कांबळे यांनी ‘थेरीगाथांचा आंबेडकरी स्त्रियांच्या लेखनावरील प्रभाव’ या प्रकरणात आंबेडकरी लेखिकांच्या कथा-कविता-वैचारिक लेखनावर जाणवणाऱ्या प्रभावाचा परामर्श घेतलाय. ‘पौर्णिमा’ काव्यसंग्रह (हिरा बनसोडे), ‘चौथी भिंत’ कथासंग्रह (ऊर्मीला पवार), बौद्धकालीन आदर्श भिक्षुणी’ कथासंग्रह (मीनाक्षी मून), ‘समर्थ स्त्रियांचा इतिहास’ (प्रा. आशालता कांबळे), ‘राहुलमाता यशोधरा’ (जयश्री गायकवाड), ‘यशोधरा’ (विद्या भोरजारे), उपेक्षित सिद्धार्थपत्नी : ‘यशोधरा’ (गाथा सोनावणे), यशोधरावरील कादंबरी (करुणा जमदाडे), बौद्धधर्मातील स्त्री जीवन’ (सुरेखा सावंत), ‘समर्थ भिक्षुणीच्या जीवनगाथा’ (सुशीला मूल-जाधव), ‘प्रज्ञा पवार यांची फोटो’ ही कविता, छाया कोरेगावकर व धम्मसंगिनी रमा गोरख यांच्या कविता अशा ललित आणि वैचारिक लेखनावर थेरीगाथांचा प्रभाव कसा दिसून येतो याची मांडणी कांबळे यांनी केलीय. कवयित्री हिरा बनसोडे यांची ‘यशोधरा’ ही कविता प्रचंड गाजली असून इंग्रजीतही भाषांतरित झालीय.

अमेरिकन विदुषी डॉ. एलीनॉर झेलीयट यांनी संपादित केलेल्या कवितासंग्रहात ही कविता समाविष्ट असून अमेरिकेत अभ्यासली गेल्याची महत्त्वपूर्ण माहिती मिळते. सुनील हेतकरांनी महाराष्ट्रातल्या संत स्त्रियांच्या आत्मचरित्रांचं व थेरीगाथेतल्या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास केलाय. जनाबाई, मुक्ताबाई, बहिणाबाई यांच्या चरित्रांचा या अनुषंगाने त्यांनी सविस्तर वेध घेतलाय. जागतिक स्तरावर थेरींचं कार्य महत्त्वाचं मानलं जातं, पण बुद्धाच्या मूळ भूमीत भारतात या बुद्धकन्यांचा इतिहास आणि त्यांची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहचू नये यासाठी अनेक जण प्रयत्नशील राहिले. भारतीय इतिहासाने थेरींची दखल घेतली असती तर भारतातल्या स्त्रीमुक्ती चळवळीला सम्यक दिशा प्राप्त झाली असती, असं सांगून महानुभाव व भागवतधर्म या पंथातल्या संत स्त्रियांपेक्षा बुद्धाच्या मार्गाचे अनुसरण करणाऱ्या स्त्रिया निश्चितच महान आहेत, असा निष्कर्ष हेतकरांनी काढलाय.

सचिन गरुड यांनी ‘थेरीगाथा’ भारतीय इतिहासातला स्त्रीमुक्तीचा पहिला उत्स्फूर्त उद्गार असल्याचं सोदाहरण विवेचन केलंय. तसेच लिंगभेद, स्त्री श्रमाला नसलेली प्रतिष्ठा, स्त्री दास्यमुक्ती ही चर्चा त्यांनी केलीय. थेरीगाथा आणि आंबेडकरवादी साहित्यावरील त्यांचा प्रभाव याची मांडणी अरविंद सुरवाडे यांनी केली आहे. आंबेडकरवादी साहित्यिकांनी सुरुवातीच्या काळात थेरीगाथा, बुद्ध तत्त्वज्ञान, पाली भाषेतलं साहित्य,बुद्धकालीन कलाकृती याकडे दुर्लक्ष केल्याचं नोंदवून अलीकडच्या काळात प्रेमानंद गज्वी, योगिराज वाघमारे, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, देवेंद्र उबाळे, सिद्धार्थ देवधेकर, संजय डोंगरे, अशोक हंडोरे यांच्या लेखनातून बौद्ध तत्त्वज्ञान, मिथ्स आढळून येत असल्याचं सांगितलंय.

या पुस्तकातलं थेरीगाथेतील ‘सौंदर्यविचार’ हे प्रकरण महत्त्वाच्या पण उपेक्षित विषयावरची सैद्धांतिक मांडणी करणारं आहे. बुद्ध साहित्यशास्त्र, बुद्ध सौंदर्यशास्त्र, बुद्ध सौंदर्यशास्त्राचे दोन प्रकार, निब्बाण संकल्पना, मनोविज्ञान, मानुषता, सौंदर्यबोध यावर लेखक मोतीराम कटारे यांनी अतिशय अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला आहे. ऊर्मीला पवार यांनी थेरींची कालातीत ‘थोरवी’ विशद करून सामाजिक चळवळीत त्यांना आलेल्या अनुभवाचं कथन व विश्लेषण केलंय. ‘थेरीगाथा’ या प्राचीन ग्रंथातल्या अनेकविध पैलूंवर अभ्यासपूर्ण मांडणी करणारं पुस्तक म्हणजे अभ्यासकांसाठी संग्राह्य असा ठेवा आहे. नवं आकलन देणारं आणि संशोधनाच्या अधिक शक्यता निर्माण करणारं आहे.

- प्रवीण घोडेस्वार.

टुडेज् ब्लॉग

घोडे कुठे अडले आहे?

आज महाराष्ट्र अस्वस्थ आहे. जातीय अभिनिवेशाच्या, राजकीय अस्थिरतेच्या संभ्रमाने महाराष्ट्राचे लोकमानस भांबावलेले आहे. कुणाकडे पाहावे? हा प्रश्न सुटणारा नाहीय. या कारणानेच आपली सांस्कृतिक आस्था तर पार शेवटच्या तळाला गेली आहे. सांस्कृतिक व्यवस्थेतही राजकीय, प्रशासनिक हस्तक्षेप वाढल्याच्या गोष्टी सध्या आपण ऐकत, वाचत आहोत. अर्थात हे आजचेच आहे असेही नाही. कारण ज्याची सत्ता त्याची कारभारी हे केवळ राजकीय, सामाजिक क्षेत्रातच चालते असे नाही. सांस्कृतिक क्षेत्रही याला अपवाद नाही. कारण या क्षेत्रातही राजकीय सत्तेच्या, नेत्यांच्या जवळ असणारी माणसे सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वाच्या पदावर जाऊन बसलेली आपणास दिसतात, पण हे आताच घडलेय, घडतेय ही ओरड मात्र बरोबर नाही. सांस्कृतिक उदासीनता हा आजार फार जुना आहे. कारण यातून मतपेट्यांचे राजकारण आणि त्यातून सत्तेचे गणित साध्य होत नसल्याने हे क्षेत्र प्राधान्यक्रमाने सर्वात खालचे असे म्हणण्यास पुरेसा वाव आहे. त्यामुळेच मराठी भाषा, साहित्य, संमेलने, मराठी शाळा, साहित्य संस्थांना मिळणारे अनुदान, साहित्य मंडळाच्या कामात हस्तक्षेप, मंडळाचे नामकरण असे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. हे मात्र खरे आहे की साहित्य संस्कृती मंडळ, मराठी विश्व मंडळ यांसारख्या सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाच्या अशा संस्थांमध्ये कामकाज करण्यासाठी प्रशासनिक, कार्यालयीन, आर्थिक बळाचा तुटवडा आहे. विश्वकोश मंडळाच्या माध्यमातून नोंद लेखकाची’ कार्यशाळेचे आयोजन मी माझ्या महाविद्यालयात २०१६ मध्ये केले होते. त्यानंतर याच मंडळाच्या एका सेमिनारला मुंबई विद्यापीठातही आम्ही काही अभ्यासक जाऊन आलेलो. लोकसंस्कृती मंडळाच्या कोशात काही नोंदीही माझ्या नावे आहेत. यादरम्यान जो अनुभव आला त्यावरून असे म्हणता येते की या मंडळामध्येही कंत्राटी पद्धतीसारखे मनुष्यबळ आहे.

कायमचे अधिकारी, कर्मचारी पुरेसे नाहीत. आर्थिक अनुदानाच्या बाबतीत तर सांगायलाच नको. त्यामुळे अनेक मान्यवरांनी या मंडळाचे काम अर्ध्यावरच तेव्हा सोडलेले. आता आर्थिक अनुदान आणि प्रशासनिक हस्तक्षेप हे मुद्दे वर आलेले. मराठी भाषा विभागाच्या वतीने पुण्यात झालेल्या एका कार्यक्रमातच साहित्य संमेलनाला दिले जाणारे अनुदान हे कशा पद्धतीने दिले जाते यावर भाषा विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्यासमोर साहित्य महामंडळामधील ज्येष्ठ पदाधिकाऱ्याने महत्त्वाचे भाष्य केले. या दोन्ही मंडळांना लाभलेल्या सचिवांच्या कामाचा झपाटा महाराष्ट्राने पाहिला आहे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे त्यांच्या अनेक विभागांत बदल्या झाल्या आहेत. आता हे मंडळ असे आहे की याची राजकीय झळ प्रत्यक्षपणे कोणत्याही मंडळांना बसणे शक्य नाही. म्हणून ती अध्यक्षांनाच बसली. कारण एवढे अनुदान वगैरे देऊन त्याचे आऊटपुट दाखवा असा अर्थपूर्ण प्रश्न त्यांनी केलेला. तर आता मराठीच्या नावाने गळे काढणे बंद करा. काहीतरी ठोस कृती कार्यक्रम राबवा. प्रत्येक विद्यापीठात स्वतंत्र अनुवाद विभाग असावा, अशी अपेक्षाही ज्येष्ठ लेखक रंगनाथ पठारे यांनी याच कार्यक्रमात व्यक्त केली. सध्या मराठी भाषा विद्यापीठाचे काम सुरू झाल्याचे आपण ऐकत आहोत. ते केव्हा पूर्णत्वास जाते हे पुढील काळात कळेलच. कारण संतपीठ निर्मितीचा प्रश्न असाच कितीतरी वर्षे प्रलंबित होता. आता पैठण येथे हे संतपीठ सुरू झाले आहे, परंतु अनुदानाच्या बाबतीत पूर्णवेळ अध्यापक, प्राध्यापक, कर्मचारी यांच्या बाबतीत तिथेही दीर्घ उदासीनता आहे.

अभिजात मराठी भाषा समितीने २०१३ मध्ये केंद्र शासनाकडे अहवाल देऊन हा प्रश्न संसदेत उपस्थित होऊनसुद्धा अजूनही अभिजात मराठी भाषेचा प्रश्न अनुत्तरित आहे. लालफितीत तो अजूनही पडून आहे. यावर आंदोलन झाल्याचे किंवा हा प्रश्न महत्त्वाचा मानून सर्व राजकीय नेते एकत्र आल्याचे दिसले नाही. काही अपवाद म्हणून स्वाक्षरी मोहिमा राबवल्या गेल्या, पण हा प्रश्न गांभीर्याने घेतलेला दिसत नाही. कदाचित हा प्रश्न मार्गी लावून याचाही राजकीय फायदा उचलण्याच्या उदात्त हेतूने हा प्रश्न इतके दिवस प्रलंबित ठेवला असेल तर येत्या निवडणुकीच्या तोंडावर हा प्रश्न मार्गी लावण्याची नामी संधी केंद्राकडे आहे. सांकृतिक धोरणाचे हे घोडे कुठे अडले ते कळत नाही.

- डॉ. अशोक लिंबेकर.

जन्म हा अखेरचा

आत्मस्थल - २

मंत्र्यांनी परत जाऊन राजाला रैक्काची अवस्था आणि निरोप सांगितला. राजाला आश्चर्य वाटले. परंतु त्याला खात्री होती की पक्षी खोटे बोलत नाहीत. माणूस खोटे बोलतो. म्हणून राजा सर्व लवाजमा घेऊन महर्षींच्या भेटीला आला. त्यांना नमस्कार करुन म्हणाला, ‘महाराज, आपण अत्यंत पुण्यवान आहात, असे मी पक्ष्याकडून ऐकले आहे. परंतु आपल्याकडे पाहिल्यावर असे दिसते की आपल्याकडे तर काहीच नाही. मग आपण मोठे कसे झालात?’

‘‘राजा,’’ रैक्क म्हणाले,‘‘काही कमावून माणूस मोठा होत असेल तर ते गमावून तो पुन्हा लहानच होतो. म्हणून असे मोठे व्हावे की पुन्हा कधीच लहान होऊ नये. शास्त्रे सांगतात की, शरीराला आत्मा मानणाऱ्या माणसाला एक कोटी गोहत्त्येचे पातक लागते. जगातली सर्व संपत्ती दान केली तरी एवढे पातक नष्ट होणार नाही. परंतु मी व्यापक आत्मा आहे, हे जाणणाऱ्या मनुष्याला एवढा पुण्यलाभ होतो की, एवढे पुण्य दान, जप, तप यामुळे देखील लाभत नाही. आत्मज्ञानी पुरुषाएवढा मोठा या जगात कोणीही नाही. मी आत्म्याला जाणले आहे.’’

राजाला खरा मोठा कोण आहे हे उमजले आणि तो महर्षींना शरण गेला. अशाप्रकारे आत्मा हा सर्वात मोठा व्यापक आहे. आत्मा निरंजन अर्थात निष्कलंक आहे. सर्वव्यापक आणि निष्कलंक असूनही आत्मा संसारात परिभ्रमण का करतो? तर मायाशरीरामुळे शिव आणि शक्ती यांच्यापासून ही सृष्टी उत्पन्न झाली. शिवाची शक्तीच सृष्टीनिर्मितीसाठी मायेचे रुप धारण करते. जे असंभव आहे ते घडवण्याचे सामर्थ्य मायाशक्तीच्या ठिकाणी आहे. ज्या क्षणी ‘मी एक आहे, मला अनेक व्हायचे आहे’ असा संकल्प शिवाच्या ठिकाणी निर्माण झाला, त्याच क्षणाला सृष्टीनिर्मिती झाली. असे क्षणार्धात सृष्टी उत्पन्न करण्याचे सामर्थ्य मायाशक्तीजवळ आहे. प्रपंच मुळात शिवरुप असूनही त्याचे आपल्याला दिसणारे रुप म्हणजे माया होय. ती जीवात्म्याला पंचविषयांच्याद्वारे आकर्षित करते. मायेमुळे मोह उत्पन्न होतो. जो विवेक नष्ट करतो, तो मोह होय. **(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

महान पंतप्रधान इंदिरा गांधी

भारताच्या सर्वात सामर्थ्यशाली पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा आज स्मृतिदिन. इंदिरा गांधींची भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात सामर्थ्यशाली आणि महत्वपूर्ण नेत्यांमध्ये गणना होते. १९ नोव्हेंबर १९१७ रोजी त्यांचा जन्म झाला. इंदिरा गांधी यांना इंदिरा हे नाव आजी आजोबांकडून मिळाले. पण लहानपणी सर्वजण त्यांना प्रियदर्शनी म्हणून बोलवायचे. आई कमला नेहरु आणि वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून त्यांना देशप्रेमाचे बाळकडू मिळाले. लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले.

त्यांचे सुरुवातीचे शिक्षण अलाहाबाद, पुणे इथे झाले. पुढे त्या रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन येथे शिक्षण घेण्यासाठी गेल्या. तिथे त्यांनी शिक्षणासोबत विविध कलाही आत्मसात केल्या. वडील पंडित जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्याचा आंदोलनात अग्रणी असल्याने बऱ्याच वेळा ते तुरुंगातच असायचे. अशा वेळी इंदिरा याच आई कमला नेहरू यांची काळजी घ्यायच्या. १८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमला नेहरू यांचे निधन झाले तेंव्हा त्यांना खूप दुःख झाले. या दुःखातून सावरण्यासाठी वडील पंडित नेहरू यांनी त्यांना विदेशात शिकण्यासाठी पाठवले. विदेशातून शिक्षण पूर्ण करुन आल्यावर २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी या उमद्या व देखण्या तरुणाशी त्यांनी विवाह केला. विवाहानंतर फिरोज गांधी व इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्याचा चळवळीत भाग घेतला. अमेरिकेने भारताला धमकी देत त्यांचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात पाठवले पण त्या घाबरल्या नाहीत त्यांनी जनतेला आणि सैनिकांना विश्वास दिला या विश्वासाच्या जोरावरच भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला आणि बांगलादेश नावाचे नवे राष्ट्र उदयास आणले. पाकिस्तानचे एक कोटी सैनिक भारताला शरण आले. सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबवून अतिरेक्यांना बाहेर काढण्यात आले. अनेक अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला. भिंद्रनवाले हा अतिरेकी या कारवाईत मारला गेला. या मोहिमेने दुखावलेल्या त्यांच्या अंगरक्षकानींच ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्यावर गोळीबार केला, त्यात त्यांचा दुःखद अंत झाला. त्यांच्या मृत्यूने भारतातच नव्हे जगात शोककळा पसरली. देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेसाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या इंदिरा गांधी यांना स्मृतिदिनी भावपूर्ण आदरांजली!

- श्याम ठाणेदार, पुणे.

फ्ल्यू बद्दलचे चार गैरसमज

अनेकांना फ्ल्यू म्हणजे फक्त वातावरण बदलाचा एक परिणाम आहे, बाकी काही फार गंभीर नाही, असं वाटतं. मात्र फ्ल्यू अजिबात धोकादायक नसतो असं समजणं चूक आहे. खरंतर, फ्ल्यू किंवा इन्फ्लूएन्झाच्या संदर्भात हा एक सर्वसाधारण गैरसमज आहे. सध्या फ्ल्यूच्या बाबतीत सर्वसाधारणपणे असलेल्या गैरसमजांप्रमाणेच गेल्या अनेक वर्षांपासून माझ्या लक्षात आलेल्या काही सर्वसाधारण गैरसमजांबद्दल इथे चर्चा करूया.

फ्ल्यू हा विषाणूंमुळे होणारा आजार म्हणजेच व्हायरल इन्फेक्शन आहे आणि विविध प्रकारच्या इन्फ्लुएन्झा विषाणूंमुळे हा आजार होतो. अनेकांना सौम्य स्वरुपाचा फ्ल्यू होत असला तरी काहींसाठी हा आजार गंभीर ठरतो. विशेषत: लहान मुलांसाठी फ्लू साध्या सर्दीपेक्षा अधिक घातक असतो आणि अनेक लहान मुलांना यातून पूर्ण बरे होण्यासाठी वैद्यकीय साह्य लागू शकते. यामुळे फुफ्फुसात न्युमोनिआ होणे, कानातील जंतूसंसर्ग आणि डिहायड्रेशन असे त्रास होऊ शकतात. काही मुलांना हॉस्पिटलमध्येही जावे लागू शकते. थोडक्यात सांगायचे तर, ‘जरा जास्त सर्दी झालीय’ यापेक्षा हा आजार अधिक असतो आणि त्यात लक्ष देऊन वैद्यकीय सहाय्य घ्यावे लागते. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे शक्य तो आजार होऊ न देणंच चांगलं.

फ्ल्यू कोणालाही होऊ शकतो. अर्थात हे खरे आहे की काही लोकांना याचा धोका अधिक असतो. उदा. पाच वर्षांखालील मुले, विशेषत: दोन वर्षांहून कमी वयाच्या मुलांमध्ये फ्ल्यूमुळे विविध प्रकारची गुंतागुंत होण्याचा धोका अधिक असतो, हे आपण जाणतोच. त्यामुळेच, भारतातील तज्ज्ञ सहा महिन्यांपेक्षा अधिक वयाच्या मुलांना फ्ल्यू लस देण्याचा सल्ला देतात.



त्याचप्रमाणे, गरोदर स्त्रिया, ज्येष्ठ नागरिक आणि रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या लोकांनाही फ्ल्यू लस घेण्याचा सल्ला दिला जाऊ शकतो.

लहान मुले आणि प्रौढांना फ्ल्यूपासून वाचवण्यासाठी फ्ल्यू लस हा एक सगळ्यात महत्त्वाचा उपाय आहे. त्याचप्रमाणे योग्य स्वच्छता राखल्यास फ्ल्यूपासून संरक्षण मिळण्यासाठी विषाणूंचा संपर्क मर्यादित राखण्यासही साह्य होते.

नियमितपणे हात धुणे, उगीच चेहरा, नाक किंवा तोंडाला हात न लावणे आणि पेन्सिल, स्टेशनरी, खेळणी, नळ, हँडल्स अशा सतत स्पर्श होणाऱ्या पृष्ठभागांचे नियमित निर्जंतुकीकरण असे उपाय करता येतील. दरवर्षी फ्ल्यूचे विषाणू आपले स्वरूप बदलतात किंवा नव्या स्वरुपातील विषाणूंचा प्रसार होतो, असे निदर्शनास आले आहे. इतकेच नाही, फ्ल्यू विषाणूंचे उत्परिवर्तनही होत असते. त्यामुळे दरवर्षी लसीचे स्वरूपही बदलण्याची गरज भासू शकते. जेणेकरून, लोकांना अधिक चांगल्या प्रकारे संरक्षण मिळेल. त्यामुळेच, इतर अनेक लसींच्या तुलनेत फ्ल्यूची लस ही वार्षिक लस प्रकारची आहे आणि ती दरवर्षी घ्यावी. मुलांना सुरुवातीला दोन डोस देऊन त्यानंतर दरवर्षी लस देता येईल. मुलांच्या लसीचे वेळापत्रक समजून घेण्यासाठी पालकांनी त्यांच्या Pediatricianer संपर्क साधावा.

आणखी एक बाब लक्षात घ्यायला हवी की फ्ल्यूची लागण झालेली व्यक्ती लक्षणे दिसून येण्याआधीच या आजाराचा प्रसार करू शकते. याच कारणामुळे, मी पालकांना आवाहन करतो की त्यांच्या Pediatricianच्या सल्ल्यानुसार लहान मुलांना दरवर्षी फ्ल्यूची लस द्या. भारतात साधारणपणे पावसाळ्याच्या आधी ही लस घेणे योग्य राहील. याच काळात इन्फ्लुएन्झाच्या रुग्णांमध्ये वाढ होते. लस घ्या, योग्य स्वच्छता राखा आणि फ्ल्यूच्या धोक्यांपासून सुरक्षित राहा.

- डॉ. विजय येवले.

***

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

संक्षिप्त वृत्त...

सोलापूरः महापालिका शाळेतील मुलांनी पिगी बँक सुरु केली असून, त्याच्या शुभारंभाप्रसंगी शिक्षकवृंद.

रोज डे .. चॉकलेट डे .. नाही तर सेव्हिंग डे !

महापालिका शाळेतील मुलांनी सुरु केली पिगी बँक

सोलापूर : पांढरे वस्ती येथे असणाऱ्या महानगरपालिका मुलींची शाळा क्रमांक- पाच येथे जागतिक बचत दिनानिमित्त मुलांना छोटे डबे पिगी बँक उपक्रमाअंतर्गत देण्यात आले.

आजी-आजोबा, काका, मामांकडून मिळालेल्या पैशांपैकी काही पैसे बचत करण्याची सवय लहानपणी लागावी, यासाठी हा उपक्रम शाळेमध्ये येण्यात आला. यावेळी इयत्ता पहिली ते चौथीमधील सर्व मुलांना मुख्याध्यापक अमोल भोसले यांच्या हस्ते डबेवाटप (गल्ला) करण्यात आले. यासाठी मुख्याध्यापक अमोल भोसले, सहशिक्षक किरण शेळके, बालवाडी शिक्षिका श्रीदेवी गोडगावे, आफ्रीन शेख यांनी परिश्रम घेतले.

माढाः येथे कँडल मार्चद्वारे श्री माढेश्वरी देवीला साकडे घालण्यात आले. त्याप्रसंगी उपस्थित महिला वर्ग दिसत आहे.

माढ्यात माढेश्वरी देवीला साकडे

माढा : माढा तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने मराठा आरक्षणासाठी कँडल मार्च काढत श्री माढेश्वरी देवीला साकडे घालून आरती केली. माढ्यातील सकल मराठा समाज बांधव आणि भगिनींनी माढ्यातील छ. शिवाजी महाराज चौकातून श्री माढेश्वरी देवी मंदिराच्या दिशेने कँडल मार्च काढला.

वेळापूरः मराठा समाजाच्या आरक्षणासाठी फळवणी येथे ग्रामस्थांनी चक्री उपोषण सुरु केले आहे.त्याप्रसंगीचे छायाचित्र.

फळवणीत आमरण उपोषण

वेळापूर : फळवणी येथील सकल मराठा बांधवांनी एस.टी. बस अडवून एसटीवर असलेल्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या पोस्टरवर काळे फासून प्रशासनाचा निषेध नोंदवला. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी फळवणी येथील सर्व ग्रामस्थांनी चक्री उपोषण सुरू केले आहे. ग्रामस्थांच्यावतीने कँडल मार्च काढून आरक्षणासाठी पाठिंबा देण्यात आला आहे. ज्योतीराम शिवाजी अवताडे यांनी आमरण उपोषणास प्रारंभ केला आहे

मगरवाडीः मगरवाडी येथे मराठा समाजाच्या आरक्षणाच्या समर्थनार्थ ग्रामस्थांनी कँडल मार्च काढला.

मगरवाडीत कँडल मार्च

मगरवाडी : पंढरपूर तालुक्यातील मगरवाडी येथे सकल मराठा समाज्याच्यावतीने कँडल मार्च काढण्यात आला. राजकीय पक्षांचे नेते, पुढाऱ्यांना गावात येण्यास व राजकीय सभा येण्यास बंदी केली आहे. मगरवाडी ग्रामपंचायतीकडून मासिक सभेत ठराव करून पंढरपूर तहसील कार्यालय, पंढरपूर तालुका पोलीस ठाणे यांना निवेदन देण्यात आले आहे. मराठा समाजाकडून पंढरपूर-मोहोळ रोडवरील मगरवाडी पाटी, पंढरपूर-तिऱ्हे मार्गे सोलापूर रोडवर तारापूर नाला येथे राजकीय पक्षांच्या नेत्यांना गाव बंदीचे फलक लावले आहेत. प्रास्ताविक पाटील, पवार यांनी केले.

● निधन वृत्त....

मंदाकिनी पाटील

वेळापूर : बोंडले (ता.माळशिरस) येथील मंदाकिनी अशोकराव पाटील यांचे सोमवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या थेट दहावे वंशज होत.

वाजिद कुरेशी

कुर्डूवाडी : कुर्डुवाडीतील मक्का मज्जिदचे नायक वाजिद महेमूद कुरेशी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

सोपानराव काळे

सोलापूर : दमाणीनगरातील पवन अपार्टमेंटमध्ये राहणारे सोपानराव लक्ष्मण काळे यांचे रविवारी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी भूमीअभिलेख कार्यालयात विविध पदांवर ३६ वर्षे सेवा बजाविली. त्यांच्यावर कोयनानगर (देगाव) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पुणे येथील जमावबंदी कार्यालयातील संतोष काळे यांचे ते वडील होत.

सोलापुरात प्रतिभा संगम राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलन

स्वागताध्यक्षपदी दत्ता सुरवसे; येत्या ४, ५ नोव्हेंबरला आयोजन

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रीय कला मंच व विद्यार्थी निधी, पुणे यांच्यावतीने आयोजित प्रतिभा संगम हे २० वे राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलन दि. ४ आणि ५ नोव्हेंबर रोजी सोलापुरातील हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात होणार आहे, अशी माहिती प्रतिभा संगम निमंत्रक दुर्गेश साठवणे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी दत्ता सुरवसे यांची निवड केली आहे.

शुक्रवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता नवी पेठ येथील शिवस्मारक संकुलातून ग्रंथदिंडी निघणार आहे. ही दिंडी नवी पेठ, चार हुतात्मा पुतळा चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे हरिभाई देवकरण प्रशालेत संमेलनस्थळी येईल. शनिवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता साहित्यिक परिचयाचे सत्र संमेलनस्थळी होईल. प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता होईल. प्रतिभा संगम साहित्य संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार आहे. याप्रसंगी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवार उपस्थित राहतील. शनिवारी सायंकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम, रात्री ९ वाजता निमंत्रित कवी व निवडक विद्यार्थी कवींचे कवी संमेलन होईल.

रविवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता पृथ्वीराज तौर यांचे व्याख्यान होईल. दुपारी १२ वाजता साहित्य अकादमीचे सदस्य डॉ. नरेंद्र पाठक यांचे विद्यार्थी चळवळ आणि साहित्य या विषयावर परिसंवाद होईल. दुपारी ३ वाजता मुलाखत सत्र होणार आहे. यात दिग्दर्शक व अभिनेता अभिराम भडकमकर यांची मुलाखत कवयित्री निकिता भागवत घेणार आहेत. अभिनेते अंशुमन विचारे यांच्या उपस्थितीत दुपारी ४.३० वाजता पारितोषिक वितरण व संमेलनाचा समारोप होणार आहे. संमेलनाला इतर निमंत्रित साहित्यिकदेखील उपस्थित राहतील.

या संमेलनाचे सहयोजक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिक्षण प्रसारक मंडळ व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आहेत. या सर्व कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अभाविप पश्चिम महाराष्ट्र प्रदेशमंत्री अनिल ठोंबरे यांनी केले.

यावेळी राष्ट्रीय कलामंचचे अखिल भारतीय सह संयोजक प्रसाद जाधव, स्वागत समिती सचिव श्रीधर खेडगीकर, महानगर अध्यक्ष प्रा. प्रशांत चाबुकस्वार, महानगरमंत्री श्रीनिवास गुन्हाल आदी उपस्थित होते.

ना. धो. महानोर साहित्य नगरी असे नामकरण

सोलापुरात होणाऱ्या प्रतिभा संगम या साहित्य संमेलन स्थळाचे ना. धो. महानोर साहित्य नगरी असे नामकरण करण्यात आले आहे. मराठी साहित्यात अमूल्य योगदान देणाऱ्या ना. धो. महानोर यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हे नामकरण केले आहे.

विठ्ठल कारखान्याचा गळीत हंगामाचा शुभारंभ

कुर्डुवाडीः म्हैसगावातील विठ्ठल कार्पोरेशन सारखान्याच्या गळीत हंगाम शुभारंभप्रसंगी आ. संजय शिंदे यांच्यासोबत मान्यवर.

सुराज्य/कुर्डुवाडी

म्हैसगाव येथील विठ्ठल कार्पोरेशन साखर कारखान्याचा १६ वा गळीत हंगाम, मोळी पूजन शुभारंभ संस्थापक चेअरमन तथा करमाळा-माढा विधानसभा मतदार संघाचे आमदार संजयमामा विठ्ठलराव शिंदे यांच्या हस्ते झाला.

यावेळी शिवचरणानंद सरस्वती महाराज, महादेव टेकडी चिंचगांव उपस्थित होते. तत्पूर्वी केनयार्ड विभागामधील सत्यनारायण काटा पूजन आबासाहेब पाटील, त्यांच्या सुविद्य पत्नी हर्षा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कार्यकारी संचालक यशवंत शिंदे, प्रांतअधिकारी प्रियंका आंबेकर, वामनभाऊ उबाळे, डॉ. जयंत करंदीकर, प्रविणदादा पाटील, उध्दव माळी, सुरेश मारुती बागल, विजयकुमार पाटील, हनुमंत पाडुळे, अशोक संचेती, सुजीत बागल, आप्पासाहेब उबाळे, सुरेश बागल, आण्णासाहेब ढाणे, धनंजय मोरे, हर्षल बागल, दादा कोल्हे, दत्ता काकडे, महेश गांधी, व्यंकटेश पाटील, निवृत्ती गोरे, सुर्यकांत गोरे, दत्ता जाधव, कैलास माळी, बाळासाहेब कांबळे बाबुराव क्षीरसागर, महेश मारकड, कानिफनाथ कोयले, औदुंबर क्षीरसागर, मधुकर पाटील, दासू जाधव, रंगनाथ माळी, कैलास माने आदी उपस्थित होते.

विविध ठिकाणीआत्महत्येचा प्रयत्न; दोन महिलांसह पाचजण रुग्णालयात

सुराज्य/सोलापूर

शहर आणि जिल्हा परिसरात विविध कारणावरून दोन महिलासह ५ जणांनी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केले. त्यांना उपचारासाठी सोलापूरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सचिन दीपक सोनवणे (वय ३० रा. रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) याने आज सोमवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास घरात कीटक नाशक प्राशन केले. काम मिळत नसल्याच्या कारणावरून त्याने हा प्रकार केला. कुंभारी घरकूल(ता.दक्षिण सोलापूर) अंबिका त्रिमूर्ती गोळसर (वय २५) हिने आज सोमवारी दुपारच्या सुमारात पतीबरोबर भांडण झाल्याच्या कारणावरून कीटकनाशक प्राशन केली.

आंधळगाव (ता.मंगळवेढा) येथे राहणाऱ्या रणजीत सुनील शिंदे (वय २३) याने रविवारी रात्रीच्या सुमारात राहत्या घरात अज्ञात कारणावरून विषारी द्रव प्राशन केले. होते त्याला बेशुध्द अवस्थेत सोलापुरात दाखल करण्यात आले. मंगळवेढा येथील वैष्णवी विठ्ठल पडवळे (वय २३) या तरुणीने राहत्या घरात अज्ञात कारणावरून कीटकनाशक प्राशन केली. रविवारी रात्री हा प्रकार घडला. तिला मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले. सलगर (ता.अक्कलकोट) येथे राहणाऱ्या सागर काशिनाथ फुलारी (वय २७) याने रविवारी रात्री ११ वाजता राहत्या घरात विषारी द्रव प्राशन केले. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले.अशा नोंदी सिव्हील पोलीस चौकीत झाल्या आहेत.

संतांच्या संगतीने मनुष्याला सत्यस्थितीचे ज्ञान होते : ह.भ.प. बाळकृष्ण महाराज

सुराज्य/दक्षिण सोलापूर

परमानंद प्राप्तीसाठी मनुष्याला जीवनात सत्य वस्तूचे ज्ञान करुन घ्यावे लागेल. सत्य वस्तूचे ज्ञान करुन घेण्यासाठी आपल्याला सत्संगाशिवाय पर्याय नाही, असे विचार ह.भ.प.श्री. बाळकृष्ण महाराज नंदेश्वर यांनी व्यक्त केले.

साधना-कुटी सत्संग मंडळ भंडारकवठे व जय हनुमान हरिभजन संघ, माळकवठे यांच्या संयुक्त विद्यमाने नववा मासिक सत्संग सोहळा रविवारी माळकवठे येथे पार पडला. त्यावेळी भाविकांचे प्रबोधन करताना ते बोलत होते. याप्रसंगी साधना कुटीचे संस्थापक विजय बिजरगी यांनी लिहिलेल्या सत्संग साधना आध्यात्म चिंतन - भाग १ या लेखनसंग्रहाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आध्यात्माची साधना कशी करावी याविषयी प.पू. बाबूराव महाराज व्हनवाड यांनी आपल्या विनोदी शैलीत प्रवचन केले. याप्रसंगी सत्संगाने मनुष्याच्या जीवनात आनंद प्राप्ती कशी होते त्या आनंदाने परमानंद प्राप्ती कशी करुन घ्यावी याविषयी डॉ. अनिल सर्जे यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन केले. यावेळी पांडुरंग भजन मंडळ- हत्ताळी, जय हनुमान भजन मंडळ-विंचूर, पांडुरंग भजन मंडळ-सादेपूर या दिंड्या सहभागी झाल्या होत्या. त्याचबरोबर निंबर्गी, कंदलगाव, उंबरज, बाळगी, भंडारकवठे, आनंदनगर, तेलगाव, माळकवठे आदि गावातील प्रमुख सत्संग मंडळी सहभागी झाले होते. सत्संग साधना या लेखनसंग्रहाचा परिचय पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी करुन दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजकुमार सगरे, अशोक लाड, दत्ता कुलकर्णी, चंद्रकांत मगरे, दत्ता काळे यांनी परिश्रम घेतले.

पुणे डॉक्टर असोसिएशनतर्फे बाल आरोग्य दिवाळी अंकाचे प्रकाशन

सुराज्य/सोलापूर

पुणे डॉक्टर असोसिएशनच्या वतीने तेजोमय २०२३ बाल आरोग्य विशेषांक दिवाळी अंक प्रकाशन सोहळा पुण्यातील आयएमए हॉल येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी टिळक रोड ते आयएमए हॉल पर्यंत अध्यक्ष डॉ राज लवंगे यांच्या संकल्पनेतून ग्रंथ दिंडी काढून डॉक्टरांनी समाजसुधारकांची वेशभूषा परिधान करून सामाजिक संदेश देखील दिला. प्रमुख पाहुणे भारती विद्यापीठाच्या संचालिका डॉ. अस्मिता जगताप, माजी अध्यक्ष मराठी साहित्य संमेलन डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा पार पडला.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ अस्मिता जगताप यांनी सुदृढ आणि निरोगी भावी पिढी निर्माण होण्यासाठी हा बाल आरोग्य दिवाळी अंक अतिशय उदबोधक असा संपादित झाला आहे आणि समाजातील शेवटच्या घटका पर्यंत अंक पोहचला तर नक्कीच सर्वांना त्याचा उपयोग होईल, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाला डॉक्टर असोसिएशन अध्यक्ष डॉ.राज लवंगे, तेजोमय मुख्य संपादक आणि उपाध्यक्ष डॉ.डी.बी. शिंदे, सचिव डॉ. दीपाली वाघ, खजिनदार डॉ.सचिन लकडे, सहसचिव डॉ.स्वप्नाली वाडेकर, सहखजिनदार डॉ.अश्विनी घोडके, नियोजित अध्यक्ष डॉ.सचिन केदार व डॉक्टर असोसिएशनचे सर्व कार्यकारणी सदस्य, सर्व माजी अध्यक्ष, सर्वच संपादकीय मंडळ संस्थेचे सर्व सभासद उपस्थित होते.

सोलापूरच्या बाजारातील बदलता नवा ट्रेंड

ग्राहकांना लाभ ऑनलाईन ऐवजी आता मोबाईलची थेट खरेदी

सोलापूर : दुकानात मोबाईल खरेदी करताना ग्राहक.

सुराज्य/सोलापूर

कोविडनंतरच्या काळात मोबाईल विक्रीच्या क्षेत्रात मेनलाईन (थेट काऊंटर खरेदी) मोबाईल खरेदीचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे. कोविड काळात ऑनलाईन व्यवहारांची चलती मोठ्या प्रमाणात होती. लॉकडाऊनमुळे ग्राहकांना दुकानावर जाता येत नव्हते. त्यानंतर मात्र पुन्हा एकदा मोबाईल क्षेत्रात मेनलाईन खरेदी म्हणजे दुकानावरच्या खरेदीचा आकडा वाढला आहे.

ऑनलाईनच्या मोबाईल खरेदीच्या ऑफर्स कोणत्याही असल्या तरी त्याच किमतीत दुकानावर देखील मोबाईल उपलब्ध होण्याचे प्रमाण वाढले आहे. ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन (आमरा) ने ऑनलाईन ऑफर्स रिटेल दुकानावरदेखील उपलब्ध व्हाव्यात, यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे आता बहुतांश मोबाईल व खरेदी योजना ऑनलाईनप्रमाणे दुकानात मिळू लागले आहेत.

ऑनलाईन खरेदीत मोबाईल आवडला नाही तर सात दिवसात परत घेतले जात आहेत. पण काही ग्राहकांना नव्या मोबाईलऐवजी इतरांनी सात दिवसात परत केलेले किंवा डिटेक्टिव्ह उत्पादने मिळू लागल्याची उदाहरणे घडू लागल्याने दुकानावरील खरेदीला प्राधान्य आपोआपच वाढले आहे. याशिवाय विक्रीपश्चात सेवादेखील दुकानाशी जोडलेली असल्याने ग्राहकांना त्याचा लाभ घेता येतो. ही सेवा ऑनलाईन खरेदीत नसल्याने ग्राहकांचा ओढा वाढतो आहे.

मेनलाईन नावाचा बदल

पूर्वी ऑफलाईन विक्री हा शब्द ऑनलाईनच्या तुलनेत वापरला जात होता. मात्र मोबाईल विक्रेता संघटनेने मोबाईल विक्रीत थेट ग्राहकांना सेवेसह दुरुस्ती, मोबाईल निवडीचे स्वातंत्र्य, प्रत्यक्ष हाताळणी या विक्री साखळीतील सर्व बाबी दुकानावर मिळत असल्याने मेनलाईन (मुख्य) खरेदी हा विशेष शब्दरचना निश्चित करत त्याचा वापर सुरु केला.

ऑनलाईन किंमत, स्कीमची दुकानात उपलब्धता, विक्री पश्चात सेवा, विविध मोबाईलची तुलना करून योग्य खरेदी करणे शक्य, स्थानिक संबंधाचा व्यवहारात लाभ, गरजेनुसार कर्ज योजनांचा विश्वासार्ह लाभ, मोबाईल प्रत्यक्ष हाताळणी करून खरेदीची सुविधा, जुन्या मोबाईलमधील डेटा ट्रान्सफरची सुविधा, सातत्याने मोबाईल खरेदीसाठी दुकानात ग्राहकांची संख्या वाढत चालली आहे. संघटनेकडून चांगल्या पद्धतीने केलेल्या प्रयत्नामुळे व मोबाईल कंपन्यांच्या सहकाऱ्याने दुकानावरील व्यवसायातून रोजगार निर्मिती देखील वाढत चालली आहे.

सचिन पत्तेवार — सिध्देश्वर कोळी

CHANGE IN NAME

I hereby declare that my old name **ASHFAKAHMED SHAIKKUTUBUDDIN MOMIN** has been change to New Name **ASHFAKAHMED SHAIKHKUTUBUDDIN MOMIN** Residing at -36 Tangsal Nagar, Jule Solapur - 413003 (Maharashtra States)

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
इंदिरा गांधी स्टेडिअम, चार पुतळा पाठीमागे, सोलापूर-४१३००१
कार्यालय सोलापूर दूरध्वनी क्र. ०२१७-२९९०६०४
Mail ID : sportoffice123@gmail.com
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./क्रीडा/२५२ — दिनांक : ३०/१०/२०२३

फेर-ई-निविदा जाहिर प्रसिध्दीकरण
ई-निविदा सुचना क्रं. २०२३-२४

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर क्रीडा कार्यालयाकडील स्वा. वीर सावरकर जलतरण तलाव (पार्थ चौक) सोलापूर, येथील जलतरण तलाव अभिकर्तामार्फत भाडे तत्वावर ११ महिने करिता देणेकामी ई-निविदा ही केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना व इतर शर्ती व अटी तसेच इतर माहिती/ सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in / www.solapurmunicipalcorporation.gov.in या संकेतस्थळावर दि. ३०/१०/२०२३ पासून पाहण्यासाठी उपलब्ध होत आहेत.

Tender ID :- 2023_SMC_958422_1

सही/-
प्र. क्रीडा अधिकारी
सोलापूर महानगरपालिका

कुर्डुवाडीमध्ये चक्री उपोषण सुरू; एसटी बसवरील फोटोला काळे फासले

सुराज्य/कुर्डुवाडी

कुर्डुवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात साखळी उपोषण सुरु केले. बस स्थानकात एस.टी. बसवरील पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या फोटोला काळे फासले. चोभेपिंपरी, ढवळस, आकुलगाव, लव्हे, बारलोणी, रोपळे, कव्हे, गवळेवाडी, कुई, शिराळा, पिंपळखुटे, अंबाड, शेडशिंग, याटपे, सापटणे, नाडी, मुंगशी, भुताष्टे, पडसाळी, चिंचोली, लऊळ, भेंड, रिधोरे,वडशिंगे, तांदुळवाडी, चिंचगाव, म्हैसगाव, भोसरे, तडवळे, रणदिवेवाडी, वेताळवाडी, वडाचीवाडी या गावात साखळी उपोषण होत आहे.

जाहीर नोटीस

मौजे लक्ष्याची वाडी ता. बार्शी व बार्शी जि. सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषः हा अशोक काशिनाथ भगाडे व बाळू काशीनाथ भगाडे रा. लक्ष्याची वाडी ता. बार्शी, यांसी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

आमचे अशिल श्रीमती सरुबाई किसन भगाडे यांचे कब्जे मालकी वहिवाटीच्या जमिनी ग. नं. ६४, ६३, ६२, ६६, ६४/१ या जमिनी मौजे लक्ष्याची वाडी येथे आहेत. तशी आमचे अशिलांची ७/१२ हक्कपत्रकी नोंद आहे. असे असताना तुम्ही वरील दोघेजण आमचे अशिलांच्या संमतीविना व त्यांना फसवून नमूद जमिनी विक्री करणेचे प्रयत्नात आहात व त्यांची रक्कम हडप करणेच्या प्रयत्नात आहात.

वास्तविक पाहता वरील कोणत्याही गटाचे वाटप झाले नसून अद्यापपोवतो त्या जमिनी अविभक्त आहेत. त्यामुळे नमूद जमिनीचे वाटप झालेशिवाय व पूर्वसंमतीशिवाय तुम्हांला त्या जमिनी विक्री करणेचा काहीही एक अधिकार तथा हक्क नाही.

आमचे अशिल स्वभावाने गरीब व भोळवट आहेत. त्यांचा गैरफायदा घेऊन वरील नमूद लोक जमिनी विक्री करुन रक्कम हडप करु लागले आहेत. सदर जमिनीत अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. नमूद जमिनी विक्री केलेस तो व्यवहार आमच्या अशिलांच्या हिश्श्यावर बंधनकारक राहणार नाही. तसेच अविभक्त हिश्याचा व्यवहार केलेस घेणार देणारांवर फौजदारी तथा दिवाणी स्वरुपाची कारवाई केली जाईल. त्याच्या नुकसानीस वरील नमुद दोघे व संबंधित सर्व लोक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहिर नोटीस दिली.

तारीख : /१०/२०२३

सही/-
श्रीमती सरुबाई किसन भगाडे रा. मौजे लक्ष्याची वाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर तर्फे
ॲडव्होकेट ए. सी. मनगिरे बार्शी सिव्हील कोर्ट बार्शी

संक्षिप्त वृत्त...

वेळापूर : राज्यस्तरावर निवड झालेल्या लोकविकास मराठी मीडियम स्कूलच्या संघासोबत मान्यवर.

राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी 'लोकविकास' संघाची निवड

वेळापूर : खेड (चाकण) येथे झालेल्या पुणे विभागीय खो-खो स्पर्धेत लोकविकास मराठी मीडियम स्कूलच्या १९ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे त्यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे. तालुका क्रीडा अधिकारी सोनलकर यांच्या हस्ते खेळाडूंना सन्मान करण्यात आला. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक अजित बनकर, सागर एकतपुरे, नितीन बनकर, शहानवाज तांबोळी, वैभव बनसोडे, धनाजी शिवपुजे, प्रमोद माने-देशमुख, रियाच तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे जालिंदर बनकर, चंद्रकांत नवले, शिंदे कन्ट्रक्शनचे राजकुमार शिंदे, गोपाळ क्षीरसागर, महाराष्ट्र पोलीस धनाजी मुटकुळे, शहाजी मंडले, सचिन बनकर, मुख्याध्यापक अमोल पांढरे, सुनिल पताळे, राहूल बनकर, सचिन साळुंखे यांनी अभिनंदन केले.

चमकदार कामगिरी करणारे खेळाडू:
या संघात अजय कश्यप, गणेश बोरकर, यशराज भानवसे, ओम बनकर, युवराज शेंडगे, अजित रणदिवे, लखन पिसे, राम लोखडे, गणेश मोटे, सौरभ पिसे, गौरव चव्हाण, सुमित म्हेत्रे यांनी सुरेख कामगिरी केली.

सांगोला : कबड्डी स्पर्धेतील विजयी संघासोबत शिक्षकवृंद.

डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे कबड्डी स्पर्धेत उल्लेखनीय यश

सांगोला : आंतर महाविद्यालयीन महिलांच्या कबड्डी स्पर्धेत डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले. सोनी महाविद्यालय, सोलापूर येथे या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत पहिला सामना डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय आणि सी.बी. खेडगी महाविद्यालय, अक्कलकोट यांच्यात झाला. यात सांगोला संघाने २० गुणांनी विजयी झाला. दुसऱ्या सामन्यात पानीव संघाचा १३ गुणांनी पराभव केला. तिसऱ्या सामन्यात स्वेरी कॉलेजचा पराभव करीत संघाने उपांत्यफेरीत पराभव करीत अंतिम फेरीत गाठली. अंतिम सामन्यात नातेपुते महाविद्यालयाचा पराभव करीत विजय नोंदवला. या संघात सुजाता श्रीकांत बाबर, संजना साळुंखे, दिव्या घनगाव, प्रियांका काकडे, अनुराधा पवार, सायली सरक, राजश्री बाबर, ऋतुजा सोनलकर यांनी यश मिळवले. त्यांना प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी, विजय पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

मोडनिंब : सोलंकरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माता-पालक मेळाव्याप्रसंगी उपस्थित पालकवर्ग.

सोलंकरवाडी शाळेत माता-पालक मेळावा

पंढरपूर : निपुण भारत अभियानांतर्गत सोलंकरवाडी जिल्हा परिषद शाळेत माता-पालक मेळाव्यात आयोजित विविध मनोरंजनात्मक खेळातून पालकांची सर्वांची मने जिंकली. यावेळी आश्लेषा यादव, ऐश्वर्या मोरे, रोहिणी राजगे, शोभा भांगिरे, अर्चना मोरे, भाग्यश्री मोरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी महिला पालकांसाठी संगीत खुर्ची, पॉट बॅलन्सिंग, बॉल पासिंग आदी खेळ घेण्यात आले. या स्पर्धेचे संचलन राजगे ताकतोडे वस्तीच्या शिक्षिका अर्चना मारकड, अंगणवाडीच्या शिक्षिका ज्योती हांडे, लता भांगिरे, कविता गलांडे, महानंदा सोलंकर यांनी केले. यावेळी डॉ.अर्चना मोरे यांनी मार्गदर्शन केले. कार्तिक इलेक्ट्रिकल्स ॲंड. गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टरच्या ऐश्वर्या मोरे यांच्यावतीने गृहोपयोगी वस्तूंच्या रूपात बक्षीसे दिली. प्रमुख पाहुणे सागर मोर, ऐश्वर्या मोरे यांनी अमृत कलशाचे पूजन करीत त्यामध्ये निधी जमा केला. सोलंकरवाडीतील माजी शिक्षक दिनकर मोरे यांनी मृत कलशामध्ये ५ हजार रुपयांचा निधी जमा केला. वामन यादव, धनाजी राजगे, राजाभाऊ भांगिरे, मुख्याध्यापक रामकृष्ण केदार, शिक्षक परमेश्वर सुरवसे, सोमनाथ शिंदे, अनिल रोकडे, अर्चना मारकड, दत्तात्रय मोरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अर्चना मारकड, परमेश्वर सुरवसे यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्याध्यापक रामकृष्ण केदार यांनी केले.

अन्नछत्र मंडळातर्फे अभिनेते नागे यांचा सत्कार

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्यावतीने अभिनेते देवदत्त नागे यांचा सत्कार सचिव श्यामराव मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पुरोहित संजय कुलकर्णी, सिध्दाराम कल्याणी, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, दत्ता माने, निखिल पाटील, संजय गोंडाळ, राहुल इंडे, गोटू माने, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली भक्तसेवा ही उल्लेखनीय असल्याचे मत अभिनेता देवदत्त नागे यांनी व्यक्त केले.

दरवर्षी पूर्व भागातून होतेय ४० लाख पणत्यांची विक्री

सोलापूर जिल्ह्यासह विजापूर, रायचूर, उस्मानाबाद लातूर आदी शहरांतून मागणी

सुराज्य/सोलापूर

नवरात्रोत्सव संपला की अंधाराकडून तेजाकडे नेणाऱ्या दिवाळीची चाहुल प्रत्येकालाच लागते. त्यामुळे दिवाळीसाठी आवश्यक वस्तूंनी सध्या बाजारपेठा सजू लागल्या आहेत. दिवाळी हा प्रामुख्याने प्रकाशाचा सण असल्यामुळे दिवाळीला पणती आणि आकाश कंदिलांना खास महत्त्व असते. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सोलापूरमध्ये सध्या पारंपारिक पणत्यांसोबतच विविध आकार व प्रकारातील पणत्या बनवण्याचे काम सुरू आहे. पूर्व भागातील नीलम नगर परिसरात असलेल्या कुंभारवाडा परिसरात लाखो पणत्या बनवण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. येथून दरवर्षी दिवाळीला सुमारे ४० लाख पणत्यांची विक्री होत असल्याचे शंकर कुंभार यांनी सांगितले.

१ ते ३५० रुपयापर्यंत पणती उपलब्ध...

काही वर्षांपूर्वी कुंभारवाड्यात एकाच साच्यातून तयार होणाऱ्या पारंपरिक पणत्याच बाजारपेठेत पाहायला मिळत होत्या. या पणत्या १ ते ३५० रुपयापर्यंत विविध किमतीत उपलब्ध आहेत. कुंदन प्रकारातील कलाकुसर केलेल्या आणि नक्षीदार पणत्या महिलांसाठी आकर्षण ठरत आहेत. कालांतराने कारागिरांनी विविध प्रकारच्या नक्षीदार पणत्या करायला सुरुवात केली. यां पणत्यांनाही ग्राहकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.

छोट्या पणत्यांना ग्राहकांची जास्त मागणी : शंकर कुंभार

सोलापूर शहरासह ग्रामीण भागातही या पणत्यांची विक्री होते. पंढरपूर मंगळवेढा सांगोला या विजापूर कर्नाटक उस्मानाबाद तुळजापूर येथेही कुंभारबंधू पण त्यांची विक्री करतात तसेच शहरात व्यापारांनाही होलसेल भावात पणती विकल्या जाता. मागच्या वर्षीप्रमाणचे यंदाच्या वर्षी देखील पणत्यांचे दर स्थिर आहेत. स्वस्तिक, पाने, फुले, चांदण्या अशा वैविध्यपूर्ण आकारातील पणत्यांसह विविध प्रकराच्या पणत्या, दिवे, मातीचे आकाश कंदील विक्रीस उपलब्ध आहेत. मात्र छोटया पणत्यांना जास्त मागणी असल्याचेही कुंभार यांनी सांगितले.

वर्षातील सर्वात मोठा दिवाळीचा सण दोन आठवड्यांवर आला आहे. दिवाळीसाठी म हत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या आणि अंगणात तसेच घरात लावण्यात येणाऱ्या पणत्या बनवण्याचे काम ही जोरात सुरू आहे. सोलापूर शहरात अनेक ठिकाणी पणत्या बनवण्याचे काम करण्यात येते. नीलम नगर परिसरात असलेल्या कुंभारवाडा येथे शंकर कुंभार आणि त्यांचे पाच बंधू पणत्या बनवण्याचे काम करत आहेत. या कुंभार बंधूकडून दरवर्षी सुमारे ४० लाख पणत्यांची विक्री केली जाते. यातील सुमारे २० लाख पणत्या कुंभार बंधू स्वतः घरी तयार करतात तर इतर वीस लाख पणत्या ते बाहेरून मागून सोलापुरात त्याची विक्री करतात. माती पासून बनवण्यात येणाऱ्या विविध आकाराच्या पणत्या कुंभार बंधू अत्यंत आकर्षक असे करतात. त्यामुळे त्यांच्या पणतीला मोठी मागणी असते.

कुंभार बंधूंचा व्यवसाय एवढा वाढला आहे की त्यांना नीलम नगर येथील जागा कमी पडत आहे. त्यामुळे त्यांनी यावर्षी वळसंग येथे पणत्या बनवण्याचे काम हाती घेतले आहे. याबाबत बोलताना कुंभार म्हणाले की, आमच्या आजोबा पणजोबापासून हा व्यवसाय सुरू आहे हा आम चा पिढी जात व्यवसाय आहे. आमच्या घरातील पाच बंधू त्यांचे कुटुंबीय लहान मुले सुद्धा पणती बनवण्याचे काम करतात. संक्रांत झाल्यानंतर आम्ही दिवाळीच्या पणती बनवण्याचे काम हाती घेतो दिवाळीपर्यंत सुमारे वीस लाख पणती तयार होतात आणि इतर वीस लाख पणती या चेन्नई येथून आम्ही आणून सोलापुरात त्याची विक्री करतो.

'वारी कालावधीत जलद दर्शनाबाबत नियोजन करावे'

सुराज्य/पंढरपूर

कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. कार्तिकी शुध्द एकादशी गुरूवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी असून, यात्रा कालावधी दि. १४ ते २७ नोव्हेंबर असा राहणार आहे. या कालावधीत यात्रेसाठी सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. येणाऱ्या वारकरी, भाविकांना आवश्यक सोयी सुविधांबरोबरच सुलभ व जलद दर्शन व्हावे, यासाठी योग्य नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत शासकीय विश्रामगृह, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रांताधिकारी गजानन गुरव, राजेंद्र शेळके, मोहोळचे प्रांताधिकारी अजिंक्य घोडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसीलदार सुशिल बेल्हेकर, गटविकरस अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव, अमित निंबकर, अभियंता भिकाजी भोळे, डॉ. एकनाथ बोधले, डॉ. जयश्री ढवळे उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी प्रशासनाकडून भाविकांसाठी देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती दिली. तसेच मंदीर समितीकडून कार्तिक यात्रा कालावधीत वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती दिली. तर उपविभागीय अधिकारी यांनी पोलीस प्रशासनाकडून वारकरी भाविकांच्या सुरक्षेबाबत व शहरात वाहतुक कोंडी होऊ नये याबाबत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली.तत्पूर्वी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी मंदीर, सीसीटीव्ही यंत्रणा,दर्शन मंडप, दर्शनरांग, पत्राशेडची, विष्णूपद बंधारा, घाट, चंद्रभागा वाळवंट तसेच ६५ एकर या ठिकाणची पाहणी करुन वारकरी भाविकांना आवश्यक सुविधा पुरविण्याबातच्या सूचना त्यांनी संबधित अधिकारी यांना केल्या.

जिल्हाधिकाऱ्यांच्य सूचना

कार्तिकी यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात पाणी सोडण्याबाबत जलसंपदा विभागाने नियोजन करावे. आरोग्य विभागाने तज्ज्ञ डॉक्टरांसह वैद्यकीय पथकाची नेमणूक करावी. तसेच फिरते वैद्यकीय पथक, मुबलक औषधसाठा उपलब्ध राहील याबाबत नियोजन करावे. अशा सूचनाही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या.

'दयानंद'च्या तेजस नाईकनवरे, नवलेची भारतीय नौदलात निवड

सोलापूर : दयानंद महाविद्यालयातून एन.सी.सी. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या तेजस नाईकनवरे व शिवशंकर नवले यांची भारतीय नौदलामध्ये निवड झाली आहे. यानिमित्त त्यांचा दयानंद शिक्षण संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ.विजयकुमार उबाळे, उपप्राचार्य अरुण खांडेकर, कॅप्टन भीमाशंकर व्हनमाने उपस्थित होते. तेजस नाईकनवरे (वाफळे, ता.मोहोळ) व शिवशंकर नवले (धोत्री, दक्षिण सोलापूर) यांचा गावामध्ये व महाविद्यालयात कौतुक होत आहे. या यशाबद्दल महेश चोप्राजी प्राचार्य डॉ.विजयकुमार उबाळे, उपप्राचार्य अरुण खांडेकर, श्रीकृष्ण माडेकर, माधव कुलकर्णी, ३८ महाराष्ट्र बटालियन एनसीसी सोलापूरचे अधिकारी कर्नल विक्रम जाधव, सुभेदार मेजर अरुण ठाकूर, सुभेदार अण्णासाहेब वाघमारे, कॅप्टन भीमाशंकर व्हनमाने आदींनी अभिनंदन केले. नाईकनवरे व नवले या विद्यार्थ्यांनी मिळेल ती कामे करुन, गरीब परिस्थितीवर मात करुन भारतीय नौदलात निवडीसाठी प्रयत्न केल्याचे भीमाशंकर व्हनमाने यांनी सांगितले.

महाराष्ट्र केसरी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सोलापूरचा संघ जाहीर

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र केसरी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी २० खेळाडूंचा सोलापुरचा संघ जाहीर झाला. ४ ते ८ नोव्हेंबरला पुण्यात राज्य होणार आहेत. सोलापूर शहर कुस्ती निवड चाचणी स्पर्धा मधून हा संघ निवडण्यात आला.

६६ व्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धे साठी सोलापूर शहराची माती आणि गादी विभागाची निवड चाचणी स्पर्धा केगाव येथे पार पडली. सोलापूर शहर तालीम संघाचे अध्यक्ष विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत शहरातील १५० हून अधिक मल्लांनी सहभाग नोंदवला. सर्वांना आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेस गोपीनाथ घोडके, वसंत सरवदे, संतोष दोरकर, राहुल सरवदे, युवराज भोसले, श्याम भोसले, शाहू भोसले, रोहित इगवे, अमर दुधाळ, दशरथ मिसाळ, किशोर सरवदे, वैजनाथ जाधव, विनय ढेपे, राजाभाऊ आलूरे यांचे सहकार्य लाभले.

दरम्यान सोलापूर शहर तालीम संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विजयकुमार देशमुख यांचा १ किलो चांदीची गदा देऊन गोपीनाथ घोडके आणि वसंत सरवदे यांनी सत्कार केला.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे...

महाराष्ट्र केसरी- गादी . इरफान शेख (५७ किलो), शुभम धुमाळ (६१), वसंत भोसले (६५), शोभराज दोरकर (७०), धीरज भोसले (७४), स्वप्नील काशीद (७९), विशाल दोरकर (८६),नागनाथ शिंदे (९२), आकाश ढेरे (९७), रविराज सरवदे (८६ते १२५.,ओपन महाराष्ट्र केसरी.) महाराष्ट्र केसरी- माती. सौरभ इगवे (५७), रवी इगवे (६१), रोहित धुमाळ (६५), ज्ञानेश्वर दोरकर (७०), गुंडू भोसले (७४), सचिन दोरकर (७९), अमित गायकवाड (८६), ऋतिक इगवे (९२), नागनाथ दोरकर (९७), रितेश भोसले (८६ ते १२५, ओपन महाराष्ट्र केसरी).

सोलापूरः ठाकूर सावदेकर विडी कंपनीच्या सर्व शाखांमध्ये महासंघाच्या बैठकी घेण्यात आल्या. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना विष्णू कारमपुरी, डॉ. गोवर्धन सुंचू.

विडी कामगारांना बोनस, हक्क रजा देण्याची मागणी

विडी कंपनीच्या सर्व शाखांमध्ये महासंघाच्या बैठका सुरू

सुराज्य/सोलापूर

ठाकूर सावदेकर विडी कंपनीतील महिला विडी कामगारांना बोनस, हक्क रजा व फरक रक्कम त्वरित देण्यात यावी, यासाठी सोलापूर कामगार संघटना महासंघाच्यावतीने अप्पर कामगार आयुक्तांना निवेदन देण्यात आले. परंतु, अद्यापही वरील रक्कम कामगारांना न मिळाल्याने महासंघाचे नेते विष्णू कारमपुरी डॉ. गोवर्धन सुंचू, सायबण्णा तेगेळळी यांनी संयुक्तरित्या ठाकूर सावदेकर विडी कंपनीच्या शाखांमध्ये कामगारांची बैठक आंदोलन सुरू केले आहे.

ठाकूर सावदेकर बिडी कंपनीतील महिला विडी कामगारांना बोनस हक्क रजा व फरक रक्कम देण्यात यावी, अशी मागणी कामगार संघटना महासंघाच्या वतीने करण्यात आले होते. तरीही कामगारांना वरील हक्काची रक्कम मिळाली नाही. त्यामुळे महासंघाच्यावतीने करण्यात येणाऱ्या आंदोलनाचा एक भाग म्हणून ठाकूर सावदेकर कंपनीच्या सर्व शाखांमध्ये महासंघाचे प्रमुख विष्णू कारमपुरी, डॉ. गोवर्धन सुंचू, सायबण्णा तेगेळळी यांनी भेट देऊन कामगारांशी संवाद साधत आहेत.

या संवादात कंपनीचे मालक व व्यवस्थापक आपले हक्क देण्यास टाळाटाळ करीत आहेत. म्हणून आपले हक्क मिळेपर्यंत आपण संघर्ष करूया, अशी भावना व्यक्त केली आहे. यास कामगारांमधून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. त्वरित वरील हक्क न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यांना 'ट्रिगर टू' लागू करावा

परिचारक यांची फडणवीस यांच्याकडे मागणी

सुराज्य/पंढरपूर

दुष्काळ निकषांचे फेर सर्वेक्षण करून पंढरपूर मंगळवेढा या दोन्ही तालुक्याला दुष्काळाचा ट्रिगर टू लागू करण्याची मागणी आ.प्रशांत परिचारक यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. यंदाच्या पावसाळ्यात पंढरपूर मंगळवेढा तालुक्यांमध्ये सरासरीच्या निम्म ही पाऊस झाला नाही. पैसेवारी पन्नासपेक्षा कमी असतानाही महाम दत प्रणाली द्वारे केलेल्या चुकींच्या सर्वेक्षणामुळे दोन्ही तालुक्याचा दुष्काळी तालुक्यात समावेश झालेला नाही. याअनुषंगाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पंढरपूर मंगळवेढा दुष्काळग्रस्त तालुक्यांना दिलासा देण्याची मागणी केली.

आ.प्रशांत परिचारक यांनी उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की पंढरपूर मंगळवेढा तालुक्यामध्ये पावसाळ्यात अत्यल्प पर्जन्यवृष्टी झाली आहे. पावसाचे अनेक दिवस खंड पडल्यामुळे खरीप हंगाम वाया गेला आहे. त्यामुळे सध्या चाऱ्याची परिस्थीती गंभीर झाली आहे. दोन्ही तालुक्यातील ओढे, नाले, तलाव, विहीरी हे नैसर्गिक स्त्रोत पावसाने न भरल्यामुळे कोरडे पडलेले आहेत. तसेच येथील शेतकरी व नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी व जनावरांच्या चाऱ्यासाठी वणवण होत आहे. त्यासाठी जनावरांसाठी चारा छावणी सुरू करण्याची ही मागणी पत्राद्वारे केलेली आहे. राज्यातील ज्या तालुक्यांमध्ये सरासरीच्या निम्याने किंवा अत्यल्प पाऊस झाला आहे. पावसाचा खुप दिवसांचा खंड, जलस्तरावरील घट, पीक पेरा आणि उत्पादनातील निम्यांहून अधिक घट, पीक वाया जाणे, चाऱ्याची गंभीर स्थिती, पिण्याच्या पाण्याची टंचाई, पाणी पुरवठ्याच्या जलस्त्रोतांची सद्यस्थिती याबाबींचा विचार करून राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये दुष्काळाचा ट्रिगर टू लागू केला आहे. पंढरपूर-मंगळवेढा या दोन्ही तालुक्याचे महामदत प्रणाली द्वारे फेर सर्वेक्षण करून दुष्काळग्रस्त तालुक्यामध्ये समावेश करावा अशी आग्रही मागणी आ. परिचारक यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

'टेंभू , म्हैसाळ योजनेतून पूर्ण क्षमतेने आवर्तन पूर्ण होणार'

सांगोला : रब्बी हंगामाचे म्हैशाळ योजनेचे पंप १७ नोव्हेंबर रोजी चालू होतील व टेंभू योजनेची रब्बी हंगामाचे पंप १५ डिसेंबर रोजी चालू होतील टेंभू चे पाणी १५ जानेवारी पर्यंत सांगोला तालुक्यामध्ये पोहोचेल या पाण्यामधून दोन्ही योजनांची रब्बी हंगाम आवर्तन यशस्वी केले जाईल, असे आ.शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना व टेंभू उपसा सिंचन या योजनांची कालवा सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे पालकमंत्री सुरेश खाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यामध्ये आ. शहाजीबापू पाटील यांनी टेल टू हेड पाणी मिळण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचना केल्या त्याचबरोबर आवर्तन चालू असताना आवर्तन यशस्वी होण्यासाठी अधिकाऱ्याने त्या ठिकाणी उपस्थित राहावे अशाही सूचना करण्यात आल्या. बैठकीसाठी खा. संजय पाटील, आमदार शहाजी बापू पाटील, आ.अनिल बाबर, आमदार सुमन पाटील, आ. विश्वजीत कदम, आ. समाधान आवताडे, आ. विक्रम सावंत, आ.अरुण लाड, आ. गोपीचंद पडळकर, दीपक साळुंखे, प्रशांत परिचारक उपस्थित होते

मराठा समाज आंदोलन...

हभप इंगळे महाराजांचे भजन आंदोलन

सोलापूरः सोलापुरातील सकल मराठा समाजाने समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी पुकारलेल्या आंदोलनास ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराज यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. यादरम्यान त्यांनी टाळ,मृदूंग, भजन गात भजन आंदोलन केले.

टेंभुर्णी : उजनी टें. येथील महिला ग्रामपंचायत सदस्या कल्याणी गवळी यांनी मराठा आरक्षणासाठी राजीनामा दिला आहे.

उजनीतील कल्याणी गवळी यांचा राजीनामा

टेंभुर्णी : उजनी टे. (माढा) येथील ग्रामपंचायत सदस्या कल्याणी मल्हारी गवळी यांनी सदस्यपदाचा राजीनामा देऊन मराठा आरक्षणाला पाठिंबा जाहीर केला. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी सोलापूर जिल्ह्यातील मातंग समाजाच्या पहिल्या महिला ग्रामपचायत सदस्य पदाचा राजीनामा कल्याणी गवळी यांनी दिला. त्यामुळे आरक्षणाची धग आता अधिकच तीव्र झाली आहे.

सांगोलाः गायगव्हाणचे ग्रामपंचायत सदस्य नवनाथ पाटील यांनी सदस्यत्त्व पदाचा राजीनामा दिला. त्याप्रसंगीचे छायाचित्र.

गायगव्हाणच्या सदस्यचा राजीनामा

सांगोला : सांगोला तालुक्यातील गायगव्हाण ग्रामपंचायतीचे सदस्य नवनाथ पाटील यांनी मराठा समाजाच्या आंदोलनास पाठिंबा देत आपल्या सदस्यत्त्व पदाचा राजीनामा दिला आहे. सरपंच अनिता बाळासाहेब कांबळे यांच्याकडे त्यांनी राजीनामा सुपूर्द केला आहे. तसेच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या तालुका अध्यक्षपदाचाही राजीनामा दिला आहे.

वेळापूरः तांदुळवाडी येथील ग्रामपंचायत सदस्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

तांदुळवाडी ग्रामपंचायत सदस्यांचे राजीनामे

वेळापूर : मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी संघर्ष योद्धा मनोज जरंगे पाटील यांनी सुरू केलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाला तांदुळवाडी सर्व ग्रामस्थांनी पाठिंबा दिला आहे. तांदुळवाडी ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांनी त्यांचे राजीनामे तांदुळवाडी सरपंचांकडे दिले आहेत. काँग्रेस पक्षाचे जिल्ह्याचे नेते ॲड. नागेश काकडे यांनीही काँग्रेस कमिटीच्या सर्व पदांचे राजीनामे दिले आहेत. दोन दिवसांपासून जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य ॲड. नागेश काकडे आणि रामकृष्ण (पिनू) बाळासाहेब कदम हे आमरण उपोषणास बसले आहेत. तांदुळवाडी शिवाजी चौक येथे चक्री उपोषण सुरू केले आहे. ग्रामस्थांच्यावतीने कँडल मार्च काढून आरक्षणासाठी पाठिंबा दिला आहे.

पंढरपुरात नगरपालिकेला टाळे ठोकले.

पंढरपुरात नगरपालिकेला ठोकले टाळे

पंढरपूर : मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसल्यापासून दिवसें दिवस आंदोलन उग्र होताना दिसून येत आहे. याचाच एक भाग म्हणून सकल मराठा समाजाने पंढरपूर नगरपालिकेला टाळे ठोकून मराठ्यांना आरक्षण मिळण्याची मागणी करीत निषेध आंदोलन केले.

चिखलीः मराठा समाजातील आंदोलनकर्त्यांनी अक्कलकोट-पुणे बसच्या काचा फोडल्या.

अक्कलकोट-पुणे बसच्या काचा फोडल्या मोहोळ तालुक्यातील हिवरे शिवारातील घटना

चिखली : मोहोळ तालुक्यात मराठा आरक्षणाची तीव्रता वाढत असून, सोमवारी सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील हिवरे शिवारात अज्ञाताने एस.टी. बसवर दगडफेक करून मागील काचा फोडल्या. मराठा आरक्षणाची तीव्रता वरचेवर वाढत आहे. या प्रश्नी अद्याप निर्णय झाला नाही. त्यामुळे मराठा समाज आक्रमक झाला आहे. सोमवारी (एम.एच. १४-ए.क्यू. ८४३) या क्रमांकाची एसटी बस अक्कलकोटहून पुण्याकडे जात होती. दरम्यान, सोलापूर- पुणे राष्ट्रीय महामार्गावरील हिवरे शिवारात आली असता, अज्ञातांनी तिच्यावर दगडफेक करून आपत्कालीन खिडकीच्या काचा फोडून सुमारे दोन हजाराचे नुकसान केले . या बाबत राम सोमन्ना शेवाळकर यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दिली. अधिक तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.

मराठा समाज आंदोलन : गावोगावात झळकले बॅनर्स; कँडल मार्चने नोंदविला निषेध

...तर समान नागरी कायदा लागू करावा!

फुलचिंचोलीतील सकळ मराठा समाजाची मागणी

सुराज्य/सोलापूर

मराठा समाजाच्या आंदोलनाचा जोर अद्यापही कायम असून, सलग सहाव्या दिवशीदेखील कोणत्याही प्रकारचा तोडगा निघाला नाही. जिल्ह्यातील गावांगावांमध्ये आता राजकीय पुढारी, नेते, आमदार, खासदार, मंत्री महोदयांना गावबंदी घालणारे फलक झलकत आहेत. ठिकठिकाणी कँडल मार्च, तिरडी आंदोलन, घेराव, चक्री उपोषणाद्वारे मराठा समाजाला तातडीने आरक्षण मिळण्याची मागणी केली जात आहे. अनेक ठिकाणी रणरागिणी महिला वर्गांनीदेखील पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे. पंढरपूर, अक्कलकोट, बार्शी, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस आदी तालुक्यांमध्ये आंदोलन आणखी तीव्र करण्यात आले आहे.

पंढरपुरात तालुक्यात आंदोलन तीव्र

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यात मराठा समाजाच्या आंदोलनास पाठिंबा दर्शविण्यासाठी समाजातील विविध समाजाचे लोक पुढाकार घेत असून, आंदोलनात सक्रीय सहभाग नोंदवून पाठिंबा देत आहेत.

आरक्षण देण्यास काय अडचण?

फुलचिंचोळी : चाळीस कोटी रुपये घेऊन जर महाराष्ट्रातील सरकार बनवले जात असतील तर मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी त्यांना काय अडचण आहे? असा सवाल पंढरपूर तालुक्यातील फुलचिंचोली येथील ग्रामस्थांनी केला आहे. सरकारला जर मराठा समाजाला आरक्षण देण्यास जमत नसेल, तर त्यांनी सगळे आरक्षण रद्द करून महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू करावा, अशी मागणीदेखील फुलचिंचोलीतील सकल मराठा समाजाच्यावतीने आंदोलनादरम्यान करण्यात आली आहे.

पंढरपूर : सकल मराठा समाजाच्यावतीने केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या पोस्टरचा दहावा घातला.

पंढरपूर : पंढरपुरात केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी मराठा आरक्षणावर केलेल्या वक्तव्याबद्दल मराठा समाजाच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला. त्यांचा निषेध म्हणून नारायण राणे यांच्या पोस्टरचा दहावा विधीपूर्वक घालण्यात आला.

पंढरपूर : मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी मराठा समाजाच्या संपूर्ण महाराष्ट्र भरातील आंदोलनास मनसेचा पाठिंबा असल्याचे जाहीर केले.तर दुसऱ्या छायाचित्रात रोपळे येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून सकल मराठा समाजाच्यावतीने पंतप्रधान,मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या एसटीवरील फोटोला काळे फासण्यात आले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न तत्काळ मार्गी लावा; आ.राम सातपुते यांची मुख्यमंत्र्यांकडे साकडे

सुराज्य/पिलीव

महाराष्ट्रात सर्वत्र मराठा समाज हा आरक्षण विषयावर आंदोलन करीत आहे. त्याने राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे आणि देत आहे. त्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून, ९९ टक्के मराठा समाज हा अल्पभूधारक आहे.

सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. मात्र आरक्षण नसल्याने गरीब मराठा कुटुंबातील मुले-मुली अनेक सोयी-सुविधांपासून वंचित आहेत.

त्यामुळे मराठा समाजास तत्काळ आरक्षण देऊन मनोज जरांगे-पाटील यांच्या आमरण उपोषणाबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशा आशयाचे पत्र माळशिरसचे आ. राम सातपुते यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

या पत्रात त्यांनी असे नमूद केले आहे, मराठा समाजाची परिस्थिती पाहता आरक्षण देणे

गरजेचे आहे. सकल मराठा समाजाच्या आरक्षण मागणीस व मनोज जरांगे-पाटील यांच्या आमरण उपोषणाबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घेऊन मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न तत्काळ मार्गी लावावा, अशी मागणी मी महाराष्ट्र राज्य विधानसभा सदस्य या नात्याने करीत आहे.

मनसे नेते दिलीप धोत्रेंचा आंदोलनास पाठिंबा

सुराज्य/पंढरपूर

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मराठा समाज बांधवांनी पुकारलेल्या आंदोलनास आपला संपूर्ण महाराष्ट्राभर पाठिंबा असल्याचे मनसेचे राज्य नेते दिलीप धोत्रे यांनी जाहीर केले. गेली ४० ते ४४ वर्षांपासून प्रलंबित असलेला मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने सोडवावा, यासाठी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे हे देखील सर्व मराठ्यांना जाहीर पाठिंबा देत आहेत. ते मराठा समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत, अशी भूमिका त्यांनी जाहीर केली. जर खरे महाराष्ट्राच्या मातीतील असाल तर महाराष्ट्रातील खासदार, आमदार यांनी मराठा समाजाला त्वरीत आरक्षण मिळवून द्यावेत, असे आवाहन पंढरपुरातील सकल मराठा समाजाच्यावतीने करण्यात आले आहे. सकल मराठा समाजाचे पंढरपूर तालुका व शहरातील आंदोलन उग्र झाले असून, त्याचे परिणाम आता टिका, टिप्पणी आणि प्रतिक्रीयेवरून दिसू लागले आहेत.

तारापुरात ब्राह्मण, मुस्लिम, भोई,धनगर समाज एकवटले

तारापूर : तारापुरातील सकल मराठा समाजाच्या साखळी उपोषणास ब्राह्मण,भोई, मुस्लिम, धनगर आदी विविध समाजातील लोक एकवटले असून, त्यांनी मराठा समाज आरक्षणाला आपला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.

कासेगाव : पंढरपूर तालुक्यातील कासेगावात सकल मराठा समाजाच्यावतीने गावातील सर्व मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला.

लक्ष्मी टाकळी: लक्ष्मी टाकळी येथे मराठा समाज साखळी उपोषणास बसला आहे. त्यांनी सर्व राजकीय पुढाऱ्यांना लक्ष्मी टाकळी येथे गाव बंदी केलेली आहे.

बोहाळी : बोहाळी येथे सकल मराठा समाजाच्यावतीने कँडल मोर्चा काढला.

रोपळे : रोपळे येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून सकल मराठा समाजाचेवतीने पंतप्रधान,मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या एसटीवरील फोटोला काळे फासण्यात आले.

सुस्ते : सुस्ते येथे ग्रामस्थांनी साखळी उपोषणास सुरुवात केली आहे.

भोसे: भोसे येथे सकल मराठा समाजाच्यावतीने मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून कँडल मार्च काढण्यात आला. या मोर्चामध्ये गावातील अबालवृद्ध, महिला वर्गांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला आहे.

अक्कलकोटमध्ये उपविभागीय अधिकाऱ्यांची आंदोलनस्थळी भेट; तहसीलदारांना निवेदन

अक्कलकोट : येथे सकल मराठा समाजाने पुकारलेल्या आंदोलनस्थळी उपविभागीय अधिकारी विठ्ठलराव उदमले यांनी भेट दिली. याप्रसंगी तहसीलदार बाळासाहेब शिरसाट यांना सकल मराठा समाजाच्यावतीने समाजाला त्वरीत आरक्षण मिळवे, या मागणीचे निवेदन सादर केले. यावेळी बाळासाहेब शिरसाट यांनी सकल मराठा समाजाच्यावतीने देण्यात आलेले निवेदन त्वरीत राज्य शासनाकडे पाठवून त्याचा पाठपुरावा, करू अशी ग्वाही दिली. याप्रसंगी उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र उपस्थित होते.

अक्कलकोटमध्ये सकल मराठा समाजाच्यावतीने आंदोलन सुरु केले आहे. त्याप्रसंगीचे छायाचित्र.

अक्कलकोटमध्ये एकच मिशन मराठा आरक्षण

अक्कलकोट : अक्कलकोट आणि तालुक्यात आता एकच मिशन मराठा आरक्षण, यासाठी मराठा समाजाच्या आरक्षण लढ्यासाठी समाज बांधवांनी एकत्रित येऊन मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढत असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी सोमवारपासून साखळी उपोषणास सुरुवात केली आहे.

दरम्यान तालुक्यातील गावांगावांमध्ये आता मराठा समाज एकवटलेला दिसत असून, कँडल मार्च, पुढाऱ्यांना गावबंदीचे पोस्टर्स, बॅनर्स झळकत आहेत.

शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करून आंदोलनाची सुरुवात

शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या पुजनाने साखळी उपोषणास सुरूवात झाली.

याप्रसंगी सकल सुरेशचंद्र सुर्यवंशी, ॲड. शरदराव फुटाणे-जाधव, शिवाजीराव पाटील, महेश इंगळे, अमोलराजे भोसले, स्वामीराव मोरे काका, सोपानराव गोंडाळ, ताराबाई हांडे, माया जाधव, मिरा बद्रुक, बाळासाहेब मोरे, सुधाकर गोंडाळ, बापुजी निंबाळकर, अरुण साळुंके, सुभाष गडसिंग, स्वामीराव सुरवसे, तम्मा शेळके, संजय मोरे, स्वामीराव मोरे, प्रदीप तोरसकर, प्रदीप जगताप, बाबासाहेब पाटील, वंचित आघाडीचे तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे उपस्थित होते.

या साखळी उपोषणास माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी, अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अप्पासाहेब पाटील, शिवसेना तालुका प्रमुख संजय देशमुख, शिवा संघटनेचे प्रा. परमेश्वर आरबाळे, माजी नगरसेवक महेश हिंडोळे, प्रा. किशनराव झिपरे, शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनिल बंडगर, रिपाइंचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, शहर अध्यक्ष अजय मुकणार, रासपचे माजी तालुकाध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी दाजी कोळेकर, विलास पाटील, रेवणसिध्द शेरी, सैदप्पा झळकी, राजू भगळे, राजू बोरगांवकर, अप्पा भालेराव, गुरुशांत दोडमनी, विजयकुमार पोतेनवरु, विठोबा कोळेकर उपस्थित होते.

रासप, रिपाइंचे साखळी उपोषण

अक्कलकोट : येथे राष्ट्रीय समाज पक्ष आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्यावतीने तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय साखळी उपोषण केले. त्याप्रसंगी तहसीलदारांना निवेदनही देण्यात आले.

अक्कलकोट : मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी राष्ट्रीय समाजवादी पक्ष (रासप) आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्यावतीने तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय साखळी उपोषण करण्यात आले.

यावेळी श्री स्वामी समर्थ देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, अमोलराजे भोसले, बाळासाहेब मोरे, सुरेश सुर्यवंशी, राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर, रिपाइंचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे, शहराध्यक्ष अजय मुकणार, रासपचे माजी तालुकाध्यक्ष दत्तात्रय माडकर, रासपचे अक्कलकोट तालुका युवक आघाडीचे अध्यक्ष दाजी कोळेकर, तालुका उपाध्यक्ष विलास पाटील, रेवणसिध्द शेरी आदी उपस्थित होते.

नान्नजच्या उपसरपंचासह सात सदस्यांचा राजीनामा

उत्तर सोलापूर : मराठा समाजाच्या आंदोलनास पाठिंबा दर्शविण्यासाठी नान्नजच्या उपसरंपाचासह सात ग्रामपंचायत सदस्यांनी राजीनामा दिला आहे.

सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथे मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ आणि मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी सुरू असलेल्या उपोषणाला उपसरपंच ज्योती संभाजी दडे यांच्यासह सात ग्रामपंचायत सदस्यांनी राजीनामा दिला आहे. त्यांनी आपले राजीनामा पत्र सरपंच राणी टोणपे, ग्रामसेवक गंगाधर कांबळे यांच्याकडे सुपूर्द केला आहे.

यावेळी ग्रामपंचायत सदस्या अरुणा गवळी, सोनाली गवळी, अश्विनी गवळी, प्रकाश चोरेकर, विश्वजीत भोसले, विनोद माने यांनी ग्रामपंचायत सदस्य पदाचा राजीनामा दिला. तो मंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

महिलांनी गावात कँडल मार्च काढला. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ त्यांच्या पोस्टर्सला जोडेमारो आंदोलन करण्यात आले. मुस्लिम समाजाच्यावतीने जामा मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष शब्बीर मुजावर, मक्का मशीद ट्रस्टचे अध्यक्ष नसीर शेख, मंजूर शेख, शहाबाज काझी, शिदायक शेख, सलीम अन्सारी, अब्बास शेख, मौलाना शेख यांनी मराठा समाज आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला आहे.

आमच्याशिवाय तुमच्या राजकारणाची फोडणी खमंग होणार नाही

प्रशांत परिचारकांना आदिवासी महादेव कोळी समाजाचा विसर पडला काय? : गणेश अंकुशराव

सुराज्य/पंढरपूर

माढा लोकसभा कोअर कमिटीची बैठक दूरदृष्टी प्रणालीद्वारे झाली तेंव्हा विधानपरिषदेचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मराठा व धनगर समाजाच्या आरक्षण प्रश्नावर केंद्र सरकारने मध्यस्थी करून सदर आरक्षण द्यावेत, अशी आग्रही मागणी केंद्रीय गृहराज्यमंत्री अजयकुमार मिश्रा यांच्याकडे केल्यानंतर पंढरपुरातील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी ''प्रशांत परिचारकांना आदिवासी महादेव कोळी समाजाचा विसर पडलायं काय? असा सवाल उपस्थित केला. दरम्यान, केंद्रीय गृहराज्यमंत्र्यांकडे मराठा आणि धनगर समाजाचा आरक्षण प्रश्न सोडवण्याची विनंती परिचारक यांनी केली. त्यावेळी त्यांना आदिवासी महादेव कोळी समाजाचे प्रश्न सोडविण्यासंदर्भात काही सुचले नसावे का? असा सवाल करीत त्यांनी खंत व्यक्त केली.

माढा लोकसभा कोर कमिटीची बैठक दूरदृष्टी प्रणालीद्वारे झाली. या बैठकीमध्ये प्रशांतराव परिचारक यांनी आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी खासदार णजितसिंह नाईक-निंबाळकर, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, आमदार जयकुमार गोरे, आ.राम सातपुते आदी मान्यवरांनी आरक्षण प्रश्नांबाबत दुजोरा दिला. परंतु गेल्या वीस दिवसांपासून जळगावमध्ये कोळी समाजाच्या जाती दाखल्याच्या मागणीसाठी आमचा आदिवासी महादेव कोळी समाज बांधव आमरण उपोषणास बसलायं, याचा उल्लेख या बैठकीत का झाला नाही? आमच्या समाजाचा वापर फक्त मतांसाठी करता का? असा सवाल करीत त्यांनी निषेध केला.

अंकुशराव म्हणाले, आदिवासी महादेव कोळी समाज हा पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यात बहुसंख्येने असून, समाजाचे ४० हजार मतदान आहे. कोळी समाजाचे मतदान प्रत्येक मतदारसंघात निर्णायक ठरतात. जिल्ह्यातील सर्व खासदार व आमदारांना विनंती आहे की, आपण कोळी समाजाच्या जातीच्या दाखल्यासाठी राज्यशासनाकडे पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करावा. कारण आम्ही जिरे, मोहरी, कडीपत्त्यासारखे आहोत, आमच्याशिवाय तुमच्या राजकारणाला खमंग फोडणी मिळणार नाही. एवढे लक्षात ठेवा, अशी प्रतिक्रिया गणेश अंकुशराव यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे नोंदविली आहे.

संक्षिप्त वृत्त

शेतात वासरू गेल्याच्या कारणावरून दोन गटात मारहाण

सोलापूर : शेतात वासरू येऊन पिकाचे नुकसान केल्याच्या कारणावरून माळी आणि वाघ यांच्या गटात दगड काठी आणि लाथाबुक्याने झालेल्या मारहाणी सहाजण जखमी झाले. ही घटना मळेगाव (ता. बार्शी) येथील शेतात रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

या प्रकरणात पांगरीच्या पोलिसांनी परस्पर विरोधी फिर्याद नोंदवून दोन्ही गटातील तीन महिलांसह दहा जणांविरुध्द गुन्हा दाखल झाला. यासंदर्भात अशोक रामचंद्र माळी (वय-३३, मळेगाव) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी नागनाथ वाघ, सूर्यकांत वाघ, आशा वाघ, शिवाजी वाघ, आणि प्रतीक्षा वाघ अशा सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल केला. माळी यांचे वासरू शेजारच्या वाघ यांच्या शेतात गेले होते. त्याच्या जाब विचारल्याच्या कारणावरून वरील आरोपींनी मारहाण केली. यावेळी महिलांनी चावा घेतल्याने त्यांची पत्नीदेखील जखमी झाली. असे माळी यांच्या फिर्यादीत नमूद आहे. नागनाथ विठोबा वाघ (वय-५२) यांच्या विरुध्द फिर्यादीवरून रामचंद्र माळी, अंकुश माळी, अशोक माळी, संजय माळी आणि विजया माळी अशा पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल झाला. तुमचे वासरू शेतात येऊन आमच्या ज्वारी पिकाचे नुकसान केले. असे सांगितले असता वरील आरोपींनी काठी आणि लाथाबुक्याने मारहाण केली. त्यात त्यांचा मुलगा सून,पत्नी जखमी झाले. असे वाघ यांच्या फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस करीत आहेत.

त्या जखमीचा सोलापुरात मृत्यू

सोलापूरः तामलवाडी ते काणेगाव या मार्गावरील लातूर बायपास रोडवर ट्रॅक्टरच्या अपघातात जखमी झालेले सतीश किसन पुरी (वय-६५, काणेगाव ता.लोहारा) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी रात्री मयत झाले. ते २५ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास तामलवाडी ते काणेगाव असे दुचाकीवरून घराकडे निघाले होते. त्यावेळी पाठीमागून ट्रॅक्टर धडकल्याने ते जखमी झाले होते. त्यांना टोळनाका कर्मचाऱ्यांनी सोलापुरात दाखल केले होते. अशी नोंद सिव्हील पोलिसात झाली आहे.

मारहाण पती-पत्नी जखमी

अक्कलकोटः सुलेरजवळगे येथील बंगलगी रोडवर दगड,लाथाबुक्यानी मारहाण केल्याने लालसाब मियासाब लावणे (वय-३२), त्यांची पत्नी शाकीरा लावणे (वय-२७) हे दोघे जखमी झाले. आकाश अर्जुन, चिन्या कुंभार, गुंड्या हुळे या तिघांनी त्यांच्या पतीला मारहाण करीत होते. त्यावेळी शाहीर या पतीस वाचवण्यासाठी गेल्या असता त्यांनादेखील त्यांनी पोटावर मारहाण केली. त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

मोहोळमध्ये एसटी बसवरील फोटोंना काळे फासले

मोहोळ : मोहोळ येथे मराठा तरुण आरक्षणा साठी वरचेवर आक्रमक होत आहेत. आंदोलनाची तीव्रता वाढताना दिसत आहे. धरणे आंदोलने, गावा-गावात कँडल मार्च काढले जात आहेत. मोहोळ बस स्थानकावर घोषणाबाजी करीत एस.टी. बसेसवरील मुख्यमंत्री, उपमुख्यमत्री यांच्या जाहीरातील पोस्टर्सला काळे फासण्यात आले.

श्रीपुरात मराठा समाजाच्या आंदोलनात शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

शालेय विद्यार्थ्यांचे उपोषण

श्रीपूर : मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, यासाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनाथ श्रीपूर येथील सकल मराठा समाज बांधवाच्यावतीने शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ चक्री उपोषण सुरू केले आहे. त्या चक्री उपोषणास सोमवारी सकाळी श्रीपुर येथील शालेय विद्यार्थ्यांनी पाठिंबा दिला.

सोलापुरात विविध समाजाचा पाठिंबा

सोलापूर : मराठा आरक्षण साखळी उपोषणास मुस्लिम, लिंगायत, वडार समाजसह विविध संघटनानी पाठिंबा दर्शविला आहे. सहाव्या दिवशी मुस्लिम, लिंगायत, वडार समाजासह पत्रा तालिम युवक मंडळासह विविध सामाजिक संघटानी पाठिंबा देत उपोषणात सहभाग नोंदवला. मुस्लीम समजाच्या वतीने आंदोलनास पाठिंबा देत उपोषणास सहभागी झाले. त्यामध्ये माजी महापौर आरिफ शेख, मतीन बागवान आणि शकील मौलवी जुबेर कुरेशी सहभागी झाले होते. मराठा समाजाची आरक्षणाची मागणी न्याय आहे. सरकारने आंदोलनाकडे दुर्लक्ष करू ने क त्वरित आरक्षण द्यावे अशी मागणी समाज बांधवानी केली.

भक्ताकडून अन्नछत्र मंडळास चपाती मेकर यंत्र भेट

पुण्यातील स्वामी भक्तांकडून अन्नछत्र मंडळास साडे आठ लाखांचे चपाती मेकर यंत्र भेट; ताशी १ हजार चपाती उपलब्ध

सुराज्य/अक्कलकोट

पुणे येथील स्वामी भक्त रामकृष्ण वसंतराव फुले आणि दिलीप साहेबराव सातकर यांनी अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास ८ लाख ३६ हजार रुपये किंमतीचे ताशी १ हजार चपाती उपलब्ध करून देणारे चपाती मेकर यंत्र रविवारी भक्तार्पण केले.

या यंत्राचे पूजन न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी रामकृष्ण वसंतराव फुले व दिलीप साहेबराव सातकर यांचा मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सुनील पवार, नारायणराव लोणकर, नंदाताई फुले, जोशना फुले, पूजा बेडगे, रेखा झगडे, दीप्ती कराळे हे उपस्थित होते.

यावेळी मंडळाचे सचिव श्यामराव मोरे, भाऊ कापसे, संतोष भोसले, मनोज निकम, ॲड. संतोष खोबरे, संतोष भोसले, पुरोहित अप्पू पुजारी, सिध्दाराम कल्याणी, एस. के. स्वामी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, बाळासाहेब याडगे, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ याडगे, देवराज हंजगे, श्रीशैल कुंभार, नामा भोसले, लाला निंबाळकर, मेजर संतोष रावले, राहुल इंडे, शिवू स्वामी, शावरप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगणूर, अक्षय यळवंडे, सागर याळवार, महेश आहेरकर उपस्थित होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामी भक्तांना सुलभ सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठभ नेहमीच आग्रही भूमिका असते. स्वामी भक्तांच्या सेवेची ३६ वर्षांची वाटचाल सुरु आहे.

अक्कलकोटः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास पुण्यातील रामकृष्ण फुले, दिलीप सातकर या स्वामी भक्तांनी चपाती मेकर यंत्र सदिच्छा भेट दिली. त्याप्रसंगी अमोलराजे भोसले यांच्यासह उपस्थित मान्यवर दिसत आहेत.

१२७ बेघरांना मिळणार स्वतःचे घर

मालोजीराजे देशमुख यांची माहिती

सुराज्य/नातेपुते

नातेपुते नगरपंचायतीने केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून नातेपुते नगरपंचायतचा प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) मध्ये दि. २८ जानेवारी २०२३ रोजी समावेश करून घेण्यात आला. या योजनेअंतर्गत नातेपुते येथील १२७ बेघरांना स्वतःचे घर मिळणार असल्याचे नातेपुते नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख यांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्ष अनिता लांडगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, अतुल पाटील, माजी नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे, अविनाश दोशी, रणवीर देशमुख, सुरेंद्र सोरटे, आण्णा पांढरे, शक्ती पलंगे, नंदकुमार लांडगे व पत्रकार बंधू उपस्थित होते.

यावेळी मालोजीराजे देशमुख म्हणाले की, 'या योजने अंतर्गत जाहीर प्रसिध्दीकरण देऊन लाभार्थींना दि. ९ मार्च २०२३ पासून अर्ज स्वीकृती प्रक्रिया चालू करण्यात आली होती.

प्राप्त अर्जांपैकी एकूण १०९ पात्र लाभार्थी यांचा सविस्तर प्रलप अहवाल (डिपीआर) दि. १९ एप्रिल २०२३ व १८ पात्र लाभार्थी यांचा सविस्तर प्रलप अहवाल (डीपीआर) दि. २७ एप्रिल २०२३ रोजी नगरपरिषद संचालनालय मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला व त्यास दि. २४ मार्च २०२३ रोजी मान्यता प्राप्त होऊन पुढील कार्यवाहीसाठी गृहनिर्माण व आणि शहरी मंत्रालय केंद्र सरकार यांच्याकडे पाठविण्यात आला होता.'

६८ व्या बैठकीत प्रकल्पाला मंजुरी

एकूण १२७ लाभार्थींचा दि. १८ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या केंद्रीय मंजुरी व देखरेख समिती (सी.एस.एम.सी.) यांच्या ६८ व्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. एकूण १२७ लाभार्थ्यांकरिता राज्य सरकार यांच्याकडून १ लाख व केंद्र सरकारकडून १.५ लाख प्रति लाभार्थी निधी उपलब्ध होणार आहे व लाभार्थींना पहिला हप्ता १ लाख रुपये बांधकाम चालू केल्यावर व दुसरा हप्ता ६० हजार लिनटेल लेवलला बांधकाम झाल्यावर व तिसरा हप्ता ६० हजार स्लॅब झाल्यावर आणि शेवटचा हप्ता ३० हजार रुपये बांधकाम पूर्ण झाल्यावर मिळणार असल्याचे उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख यांनी सांगितले.

सेटलमेंट फ्री कॉलनीत दोन गटात मारहाण

दोन महिलासह ५ जखमी

सुराज्य/सोलापूर

नवरा बायकोच्या भांडणात जाब विचारल्याच्या कारणावरून दोन गटात तलवार, चाकू आणि लाथाबुक्क्याने झालेल्या मारहाणीत २ महिलासह ५ जण जखमी झाले. ही घटना सलगरवस्ती परिसरातील सेटलमेंट फ्री कॉलनी येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली.सर्व जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

स्नेहा व्यंकटेश गायकवाड (वय२७) ज्योती सुरेश अंजयी (वय ४०), मारुती कल्लाप्पा बल्लारी (वय २५) आणि युवराज सुरेश कोरवार (वय २५ सर्व रा. सेटलमेंट फ्री कॉलनी) अशी जखमींची नावे आहेत. काल सायंकाळी सात वाजेच्या सुमारास त्यांच्या घराजवळ पती-पत्नीचे भांडण झाले होते. त्या भांडणाबाबत विचारले असता पंकज गायकवाड, पिंट्या गायकवाड, श्री जाधव आणि इतर दोघांनी मिळून त्यांना तलवार आणि चाकूने मारहाण केली. असे नोंद सिव्हील पोलिसात झाली आहे. तर दुसऱ्या गटातील पंकज जनार्दन गायकवाड (वय ३३ रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर २) असे जखमीचे नाव आहे. त्याला याच कारणावरून स्नेहा गायकवाड, युवराज सुरेश कारवा, व्यंकटेश गायकवाड व इतर तिघांनी मिळून त्यांना तलवार आणि चाकूने मारहाण केली.या दोन्ही घटनांची नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली असून अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही.

माढा : ग्रामपंचायत सदस्याचा राजीनामा

टेंभुर्णीः माढा तालुक्यातील परिते येथे सकल मराठा समाजाच्यावतीने गावातील मुख्य चौकात साखळी उपोषणाचा लढा सुरू करण्यात आला आहे. उपोषणास बसलेले मराठा समाज बांधव दिसत आहेत.

टेंभुर्णीः माढा तालुक्यातील गावोगावी मराठा समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी साखळी, चक्री उपोषण, धरणे आंदोलन आणि राजकीय नेत्यांना गावबंदी, कँडल मार्चद्वारे शासनाचा निषेध नोंदविला जात आहे. माढा तालुक्यातील परिते येथे सकल मराठा समाजाच्यावतीने गावातील मुख्य चौकात साखळी उपोषणाचा लढा सुरू करण्यात आला आहे. परिते गावातील ग्रामपंचायत सदस्या मनिषा नवनाथ लामकाने यांनी आपल्या ग्रामपंचायत सदस्यत्त्वाचा राजीनामा देऊन या लढ्यामध्ये सहभाग येतला आहे.माढा तालुक्यातील त्या पहिल्या राजीनामा देणाऱ्या सदस्य ठरलेल्या आहेत.

सांगोल्यातील आंदोलनास महिलांचा प्रतिसाद

सांगोला : सांगोल्यातील आंदोलनात महिलांनीदेखील सक्रीय सहभाग नोंदविला आहे.छत्रपती शिवाजी महाराज चौकात साखळी पद्धतीने उपोषण व धरणे आंदोलन सुरु आहे.

यावेळी माजी नगरसेवक स्वाती मगर, सिमा कोडक यांनी महिला वर्गाला मार्गदर्शन केले.

सांगोला :एकतपूर येथे सकल मराठा समाजाच्यावतीने मराठा समाजाच्या आरक्षणासाठी रस्तारोको आंदोलन करण्यात आले. त्याप्रसंगीचे छायाचित्र.

जुन्या कुणबी नोंदीचे प्रमाणपत्र मराठ्यांना मिळणार

सुराज्य/मुंबई

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राज्यभरात पेटलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाची घोषणा केली.

कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना तातडीने दाखले दिले जातील. त्याचवेळी सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिव्ह पेटिशनच्या माध्यमातून मराठा आरक्षण मिळवण्यासाठी नव्याने प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृहावर मराठा आरक्षण उपसमितीची बैठक बोलावण्यात आली होती. या समितीनं आत्तापर्यंत केलेल्या कामाचा अहवाल सादर केला. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन बैठकीतील तपशील सर्वांसमोर मांडला.

मुख्यमंत्री काय म्हणाले?

'मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात आणि मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण आणि राज्याच्या विविध भागात आंदोलनं सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर अतिश्य महत्त्वाची मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मी सहभागी झालो होतो. या बैठकीमध्ये अतिश्य तपशीलवार चर्चा झाली. त्यामध्ये न्यायमूर्ती शिंदे साहेबांची समिती आपण स्थापन केली होती, जुन्या कुणबी नोंदी शोधण्यासाठी. त्या समितीने आमच्याकडे अहवाल सादर केला आहे. हा अहवाल आम्ही उद्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडून स्वीकारून पुढील प्रक्रिया करु.

सोलापूर : पत्रा तालिम युवक मंडळाचे सदस्यांनी माजी उपमहापौर पद्माकर काळे यांच्या नेतृत्त्वाखाली आंदोलनाला पाठिंबा दिला. यामध्ये शिवाजी घाडगे, श्रीकांत घाडगे, संजय गायकवाड, देविदास घुले, धनराज शिंदे, निशांत चवळगी, सचिन स्वामी, हरी सावंत, अमोल चव्हाण, प्रभाकर बोजरंगे सहभागी झाले होते.

अकलुजमध्ये आंतरराष्ट्रीय कुस्ती, त्रिमूर्ती केसरी कुस्ती स्पर्धा

सुराज्य/माळीनगर

श्रीमती रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते-पाटील ऊर्फ आक्कासाहेब यांची जन्मशताब्दी, जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या वाटचालीनिमित्त शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ, शंकरनगर-अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने अकलुजात आंतरराष्ट्रीय कुस्ती व त्रिमूर्ती केसरी कुस्ती स्पर्धांचे आयोजन केले आहे, अशी माहिती प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील व कुस्ती स्पर्धेचे प्रमुख संयोजक सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.



श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते- पाटील

शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ, शंकरनगर-अकलूज यांच्या विद्यमाने दि. २९, ३० नोव्हेंबर आणि दि. १ डिसेंबर रोजी शिवतीर्थ आखाडा, शंकरनगर-अकलूज येथे आंतरराष्ट्रीय कुस्ती व त्रिमूर्ती केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यातील कार्यक्रमास अर्जुन पुरस्कार प्राप्त जागतिक दर्जाचे कुस्ती खेळाडू माजी आयपीएस अधिकारी पै. कर्तारसिंग यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रण दिले आहे. कुस्ती स्पर्धेचे प्रमुख संयोजक सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील, राष्ट्रकूल स्पर्धा विजेते राम सारंग, संचालक वसंतराव जाधव, उमेश भिंगे यांच्यातर्फे त्यांना स्पर्धेचे निमंत्रण देण्यात आले आहे. त्यांनी हे निमंत्रण स्विकारले आहे. आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेच्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याची सहमती दर्शविली आहे, अशी माहिती प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी जयसिंह मोहिते-पाटील व कुस्ती स्पधचे प्रमुख संयोजक सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वीरशैव लिंगायत समाजाचा पाठिंबा

सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील मराठा समाज बांधवांच्या आंदोलनास वीरशैव लिंगायत समाज बांधवांनी पाठिंबा दर्शविला आहे. मराठा बांधवांना वीरशैव लिंगायत समाज व महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ, श्री सिध्द मल्लिकार्जुन प्रतिष्ठान, यांच्या वतीने समर्थनाचे पत्र देऊन जाहीर पाठिंबा दिला. नाना काळे, राजन जाधव, विनोद भोसले, गणेश डोंगरे, यांच्याकडे पाठिंबाचे पत्र सुपूत्र करण्यात आले. यावेळी वीरशैव लिंगायत समाजाचे आनंद मुस्तारे, गणेश चिंचोली, सचिन शिवशक्ती, वैभव विभुते, प्रवीण वाले, मल्लिनाथ सोलापुरे, गुरु शांत मोकाशी, जगदीश कोन्हाळीकर आदी वीरशैव लिंगायत समाजाचे बांधव उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त...

शिक्षक आमदार म्हात्रे यांची जि.प.ला धावती भेट

सोलापूर : शिवसेना शिंदे गटाचे कोकणातील शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे हे सोमवारी सोलापुरात आले होते त्यांनी दुपारी बाराच्या सुमारास जिल्हा परिषदेमध्ये धावती भेट घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, शिक्षण अधिकारी तृप्ती अंधारे आणि माध्यमिक शिक्षण विभागाच्या काही संघटनांसोबत बैठक घेतली. दुपारी एकच्या दरम्यान ते सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये बैठक घेत असल्याची माहिती मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलकांना जेव्हा मिळाली. तेव्हा सुमारे १०० मराठा समाजाचे आंदोलनकर्ते जिल्हा परिषदेमध्ये घोषणा देत आले. मराठा बांधवांचा रोष आणि आक्रमकता पाहून आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी पोलीस बंदोबस्तामध्ये जिल्हा परिषदेच्या बाहेर पडणे पसंत केले.

महापालिकेच्या शिक्षिकांनी सर केले कळसुबाई शिखर

सोलापूर : महापालिका शाळा क्रमांक ४ च्या ६ शिक्षिकांनी कळसुबाई हे महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसुबाई शिखर सर केले. कळसुबाई हे अकोला तालुक्यातील, अहमदनगर जिल्ह्यातील महाराष्ट्राचा सर्वोच्च शिखर असलेले शिखर आहे. उत्तरेकडील सह्याद्री पर्वत रांगेतील कळसुबाई शिखराची उंची १ हजार ६४६ मीटर आहे. हे शिखर महापालिका शाळा मधील सहा शिक्षिकांनी सर केले आहे. या मोहिमेत गीता ढाकणे, अमृता नांदवटे, राजश्री भुतनाळे, उमा चंदनशिवे, उमादेवी मुंढे, लक्ष्मी जाधव या शिक्षिकांनी सहभाग घेतला. याबद्दल या शिक्षकांचे कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

आज ऑनलाईन रोजगार मेळावा

सोलापूर : जिल्ह्यातील सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांसाठी आज मंगळवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर यांचेमार्फत पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रभारी सहायक आयुक्त ह. श्री. नलावडे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे. रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आय.टी.आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, नर्सिंग, पदवी, इलेक्ट्रीशीय, मशिन ऑपरेटर अशा प्रकारची एकुण ४१० पेक्षा जास्त रिक्तपदे २ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचीत केलेली आहेत. नोकरी इच्छुक उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी पूर्ण करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी ऑनलाईन अँप्लाय करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

३ ते ५ नोव्हेंबर दरम्यान रंगणार प्रिसिजन गप्पा

- विज्ञान आश्रम पाबळ, विद्यार्थी विकास योजनांना प्रिसिजन सामाजिक पुरस्कार
- डॉ. अभय बंग यांची प्रकट मुलाखत; बाईपण भारी देवामधील कलाकारांशी गप्पा

सुराज्य/सोलापूर

प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने येत्या ३, ०४ आणि ०५ नोव्हेंबर २०२३ रोजी शिवछत्रपती रंगभवन येथे प्रिसिजन गप्पा' आयोजिल्या आहेत. सोलापूरकर रसिकांना दिवाळी आधीच सांस्कृतिक गप्पांची दिवाळी अनुभवता येणार आहे. प्रिसिजन गप्पांचे हे १५ वे वर्ष आहे. संगीत, नाटक, साहित्य, विविध कलांच्या आस्वादासोबतच सामाजिक जाणीव जागृत करणाऱ्या गप्पांनी सोलापूरचं सांस्कृतिक पर्यावरण समृद्ध केलं आहे. यावर्षीही दर्जेदार विषय, आगळे वेगळे व्यक्तीमत्त्व आणि त्यांच्यासोबतच्या सकस गप्पा असा त्रिवेणी संगम घडणार आहे, अशी माहिती प्रिसीजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी दिली. यावेळी प्रिसीजन समूहाचे चेअरमन यतीन शहा उपस्थित होते.

यंदाच्या प्रिसिजन गप्पांना शुक्रवार, दि. ३ नोव्हेंबर २०२३ 'प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्काराने' सुरवात होईल. या वर्षीचा 'प्रिसीजन सामाजिक कृतज्ञता पुरस्कार सेवा सहयोग फाऊंडेशनच्या विद्यार्थी विकास योजना प्रकल्पाचे प्रमुख रविंद्र कर्वे यांना देण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, तीन लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. स्व. सुभाष रावजी शहा स्मृती पुरस्कार हा विज्ञान आश्रम पाबळ जि.पुणे या संस्थेला देण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, दोन लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेच्यावतीने डॉ. योगेश कुलकर्णी हा पुरस्कार स्विकारतील. प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या हस्ते दोन्ही संस्थांना पुरस्कार प्रदान केले जातील. पुरस्कार सोहळ्यानंतर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांची प्रकट मुलाखत होईल. विवेक सावंत आणि मुक्ता पुणतांबेकर हे दोन्ही मान्यवर डॉ अभय बंग यांची मुलाखत घेतील. शनिवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी बाईपण भारी देवा या चित्रपटातील कलाकार रोहिणी हट्टंगडी, सुकन्या कुलकर्णी, शिल्पा नवलकर, चित्रपटाचे दिग्दर्शक केदार शिंदे, निखील साने यांच्या सोबतच्या दिलखुलास गप्पा आणि या चित्रपटाच्या पडद्यामागील कहाणी मुलाखतीच्या माध्यमातून सोलापूरकरांना ऐकावला मिळणार आहेत. प्रसिध्द सूत्रसंचालक अभिनेत्री डॉ. समिरा गुजर- जोशी या सर्वांच्या मुलाखती घेतील.

रविवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी राजस्थानी पारंपरिक संगीताचा मागोवा घेणारा कार्यक्रम होईल. जैसलमेर येथील राजस्थानी कलाकार बादल खान, मुलतान खान, कुटाला खान आणि हाकीम खान या कलाकारांशी संवाद साधला जाणार आहे.

एलईडी प्रोजेक्टरद्वारे कार्यक्रम पाहण्याची सोय

प्रिसीजनच्या प्रथेप्रमाणे तीनही दिवस सायं. ६.२५ वा. गप्पांना प्रारंभ होईल. नेहमीप्रमाणेच शिवछत्रपती रंगभवनमध्ये या गप्पा आयोजित केल्या आहेत. रंगभवनच्या प्रांगणातही आसनव्यवस्था व एलईडी प्रोजेक्टरद्वारे कार्यक्रम पाहण्याची सोय असेल. रसिकांच्या पार्किंगची व्यवस्था वोरोनोको शाळेच्या मैदानावर केली आहे. रसिक सोलापूरकरांनी 'प्रिसिजन गप्पां'चा मनमुराद आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सुहासिन, यतीन शहा यांनी केले.

एमआयडीसीमधील सर्व कारखान्यांची होणार तपासणी; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

सुराज्य/सोलापूर

औद्योगिक वसाहतीमधील औषध तयार करणाऱ्या रासायनिक कारखान्यांमध्ये कोणत्याही अंमली पदार्थाचे उत्पादन होणार नाही याची दक्षता अन्न व औषध प्रशासन विभागाने घ्यावी, अन्न औषध प्रशासन, औद्योगिक विकास महामंडळ व पोलीस प्रशासन विभागाने संयुक्त पथकाच्या माध्यमातून कारखान्याची अचानक तपासणी करावी असे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हास्तरीय नार्को को-ऑर्डीनेशन समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली यावेळी हे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) डॉ. उमेश काकडे, केंद्रीय गुप्त वार्ता उपायुक्त किशोर कनकी, कस्टम विभाग अधीक्षक संजय कुमार, अन्न व औषध प्रशासन सहायक आयुक्त सचिन कांबळे, अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब कांबळे, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन कांबळे, विद्यापीठाचे कुलसचिव एसी.पी. सोनकांबळे, पो स्टऑफीस अधीक्षक आर.डी. कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, श्वान पथक पोलीस उपनिरीक्षक.बी.बी.मस्के आदी उपस्थित होते.

गळीत हंगामात साखर कारखान्याचे को-जनरेशन प्लांटमध्ये कोणत्याही प्रकारे अंमली पदार्थ तयार होणार नाहीत याबाबतची दक्षता राज्य उत्पादन शुल्क विभागाने घ्यावी. औद्योगिक विकास महामंडळाने नोंदणीकृत व बंद असलेल्या रासायनिक कंपन्यांची माहिती द्यावी अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

गांजा व खसखस पिकांची लागवड होणार नाही यासाठी कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सेवकांची कृषी विभागाने नेमणूक करावी तसेच ग्रामीण भागात अंमली पदार्थांची लागवड करणे हा अपराध असून त्याबाबत गुन्हा दाखल होऊ शकतो याबाबतही प्रत्येक गावांत जनजागृती करावी. जिल्ह्यात वनक्षेत्र असलेल्या दुर्गम भागात वेळोवेळी भेटी देऊन अमली पदार्थांची लागवड होणार नाही याची दक्षता वन विभागाने घ्यावी अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

मनीषा आव्हाळे यांनी नवीन दालनात सुरु केले केले प्रशासकीय काम

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सोमवारी नव्याने तयार करण्यात आलेल्या दालनात प्रशासकीय कामकाज सुरुवात केली आहे. जिल्हा परिषदेच्या दर्शनी भागात असलेल्या अर्थ विभागाची संपूर्ण जागा त्यांनी घेतली आणि त्या ठिकाणी आपले नवीन दालन आणि कॉन्फरन्स हॉल तयार केला आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर रुजू झाल्यानंतर मनीषा आव्हाळे यांनी सुरूवातीला कामकाजाला शिस्त लावण्याचे काम केले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे दालन आणि त्याच्या बाजूला असलेल्या मीटिंग हॉल अर्थात व्हिडिओ कॉन्फरन्सिंग रूममध्ये बसून बराच वेळ कामकाज करावे लागते. परंतु हे कामकाज करताना सीईओच्या जुन्या दालनात आणि शेजारी असलेल्या मीटिंग हॉलमध्ये अधिकाऱ्यांची कुचंबणा होत होती. त्याला कारण हे तसेच. या दोन्ही ठिकाणी खेळती हवा नसल्याने आणि बंदिस्त कार्यालय असल्याने तासन् तास बैठकीला आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगला बसणाऱ्या अधिकाऱ्यांना त्रास सहन करावा लागत होता.

या सर्व बाबींचा विचार करून मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी आपले संपूर्ण दालन आणि मीटिंग हॉलची जागा बदलण्याचा निर्णय घेतला. जिल्हा परिषदेच्या दर्शनी भागात असलेल्या अर्थ विभागाची संपूर्ण जागा त्यांनी घेतली आणि त्या ठिकाणी आपले नवीन दालन आणि कॉन्फरन्स हॉल तयार केला. मागील दोन महिन्यांमध्ये हे काम करण्यात आले. शनिवारी त्यांनी या कार्यालयात प्रवेश करून कॉन्फरन्स हॉलमध्ये अधिकाऱ्यांची पहिली बैठक घेतली. अतिशय प्रशस्त जागेमध्ये आणि मोकळ्या वातावरणात ही बैठक झाल्याने अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावरही आनंद पाहायला मिळाला. कार्यालय पाहिले असता अतिशय कॉर्पोरेट असा लूक दिसून येतो. मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी या नव्या दालनातून आपले कामकाज सुरू केले आहे.

३१ ऑक्टोबरला प्रारूप मतदार यादीचे वाचन

सुराज्य/सोलापूर

मुख्य निवडणूक अधिकारी व अपर मुख्य सचिव निवडणूक यांनी दिलेल्या सूचनेनुसार २७ ऑक्टोबर रोजी प्रसिध्द झालेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकींकरिता वापरावयाची प्रारूप मतदार यादीचे वाचन ३१ ऑक्टोबर रोजी महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रभागामध्ये ४ ठिकाणी करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.

प्रारूप मतदार यादी वाचनास तिन्ही मतदार संघातील बीएओ ऑफिसर व महानगरपालिकेतील विभागीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. मयत मतदार, स्थलांतरीत मतदार, नवे मतदार महिला मतदार, दिव्यांग मतदारांची पडताळणी करुन पात्र मतदारांची नावे मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यची कार्यवाही यावेळी करण्यात येणार आहे.

केगाव येथील पिकनिक पॉईंट नवीन वर्षात होणार खुले

सुराज्य/सोलापूर

महापालिकेपासून आठ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या केगाव नजीक होणाऱ्या नियोजित इको पार्कचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या नवीन वर्षात जानेवारीच्या सुरुवातीला हे इको पार्क पिकनिक पॉईंट सर्वांसाठी खुले करण्याचे नियोजन असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिली.

केगाव नजीक ४७ एकर जागेवर पिकनिक पॉईंट म्हणजेच इको पार्क विकसित केला जाणार असून या ठिकाणी डीपीडीसीतुन १ कोटी ४५ लाख रुपयाचा निधी तत्कालीन पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या कारकिर्दीत मंजूर झाला होता. या निधीतून विविध कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. या इको पार्कमध्ये (पिकनिक स्पॉट) मंजूर निधीतून सायकल ट्रॅक, गझिबो, रॉक गार्डन, इंटरन्स प्लाझा, रॉ गार्डन, प्रसाधनगृह, ओपन गार्डन आदी कामे हाती घेण्यात आली आहेत. बहुतांश कामे पूर्ण झाले आहेत. पहिल्या टप्प्यातील हे काम अंतिम टप्प्यात आहे आहे. ४७ एकर जागेची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन नागरिकांसाठी छोटेसे तळे देखील तयार होईल अशी व्यवस्था करण्यात आल्याची माहिती कारंजे यांनी दिली.

दहा हजार वृक्ष लागवड

विस्तीर्ण अशा ४७ एकरावर आत्तापर्यंत सुमारे दहा हजार वृक्ष लागवड करण्यात आली आहे. ही झाडे वाढली आहेत. हिरवाईने नटलेला हा परिसर आता सर्वांना आल्हादायक व पिकनिक स्पॉट म्हणून मुक्तसंचार करण्यासाठी आनंददायी असा ठरणार आहे, असेही अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे यांनी सांगितले.

ठाकरे गटाच्या उपजिल्हा प्रमुखपदी रविकांत कांबळे

सुराज्य/सोलापूर

शिवसेना ठाकरे गटाच्या उपजिल्हा प्रमुखपदी रविकांत कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना लोकसभा प्रमुख पुरुषोत्तम बरडे, जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या शिफारसीनुसार ही निवड करण्यात आली आहे.

निवडीनंतर मित्र परिवारातर्फे रविकांत कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. पक्षाने दिलेली जबाबदारी आपण पार पाडू आणि ग्रामीण भागात उद्धव ठाकरे यांचे विचार पोहचवू असे निवडीनंतर कांबळे यांनी सांगितले.

माढेश्वरी देवीचे मंदिर सुधारण्याचा मार्ग मोकळा

- आमदार बबनदादा शिंदे यांनी दिली माहिती

सुराज्य/माढा

राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत हाती घेतलेल्या ११ सुत्री कार्यक्रमांतर्गत नमो तीर्थस्थळ सुधार अभियानातून राज्यातील पवित्र ऐतिहासिक धार्मिक स्थळांची सुधारणा होणार असून यामध्ये माढा येथील माढेश्वरी देवीच्या मंदिराचा समावेश झाला असल्याची माहिती आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

आ.शिंदे म्हणाले की, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत नमो तीर्थस्थळ सुधार अभियान अंतर्गत पवित्र व ऐतिहासिक धार्मिक स्थळे, मंदिरे,बारव,तलाव यांची सुधारणा होणार आहे. या अभियानाअंतर्गत ऐतिहासिक व पुरातन मंदिरांचा जिर्णोध्दार करणे, प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देणे, डिजीटल दर्शन, परिसर सुशोभिकरण करणे, स्वच्छता आदी कामांचा यामध्ये सामावेश आहे. सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक धार्मिक स्थळ माढा येथील माढेश्वरी मंदीर हे धार्मिक स्थळ असून त्यास ऐतिहासिक महत्व आहे. या मंदिराची डागडूजी करणे,सभामंडप दुरुस्ती, शिखर,छत दुरुस्ती,भिंतींची कामे, मंदिर परिसर सुशोभिकरण करणे यासह अन्य कामे हाती घेण्यासाठी निधीची तरतूद करण्यासाठी शासनाकडे मागणी केली आहे. या मंदिराचा समावेश सांस्कृतिक कार्य विभागाकडून घोषित करण्यात आलेल्या तीर्थस्थळ सुधार योजनेत झाल्यामुळे या कामास गती मिळणार आहे.

लवकरच कामे सुरु होणार

माढा शहरातील माढेश्वरी मंदिर व ऐतिहासिक किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. त्या ठिकाणी जी कामे करावयाची आहेत त्यांचे नकाशे, अंदाजपत्रके बनविण्याचे काम अंतिम टप्प्यांत आहेत. यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची शासनाकडून तरतूद करुन लवकरच कामे सुरु करण्यात येतीलख असे आ.बबनराव शिंदे यांनी सांगितले.

रंगदाळ यांच्या चारकोल रेखाचित्रांचे दिल्लीत प्रदर्शन

सोलापूर : शहरातील, जय भवानी प्रशालेतील कलाशिक्षक बंडु रंगदाळ यांचे चिरंजीव कलाकार नितीन बंडू रंगदाळ यांचे चारकोल रेखाचित्रांचे एकल प्रदर्शन सर्वात्म अत्यंत प्रतिष्ठित ललित कला अकादमी, नवी दिल्लीत सुरू आहे.

हे प्रदर्शन २८ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू झाले असून ३ नोव्हेंबर रोजी समारोप होणार आहे. नितीन यांनी आपले कला शिक्षणाचे पहीले धडे वडीलांकडुन आणि शहरातील कला व्यवसाय केंद्र येथुन घेतले आहे. त्यांनी कलेतील उच्च शिक्षण देशातील सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथून पूर्ण केले आहे. त्यांनी आतापर्यंत देशभरात अनेक ठिकाणी आपल्या कलेचे प्रदर्शन केले आहेत. कलाक्षेत्रात त्यांचा उल्लेखनीय प्रवास आहे.

आयुक्तांसह अन्य अधिकाऱ्यांच्या कार्यालय स्थलांतरास दिवाळीनंतरचा मुहूर्त

सुराज्य/सोलापूर

महापालिका आयुक्तांसह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यालये दिवाळीनंतर सुशोभीकरण करण्यात आलेल्या इंद्रभुवन इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात येणार आहेत. दिवाळीपर्यंत फर्निचरसह हायड्रोलिक लिफ्टचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतरचा मुहूर्त कार्यालय स्थलांतरास शोधण्यात येणार आहे.

सोलापूर महापालिका आवारातील ११० वर्षांची जुनी असलेली पुरातन वास्तू असलेल्या इंद्रभुवन इमारतीचे सुशोभीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले दि. २४ मे २०२३ रोजी सुशोभीकरण केलेल्या वास्तूचे लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यापूर्वी या इमारतीमध्ये महापालिका आयुक्तांसह उपायुक्त व सहाय्यक आयुक्तांची कार्यालये होती. या इमारतीच्या नूतनीकरणामुळे महापालिकेतील कौन्सिल हॉल सभागृहात पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयांमध्ये अधिकाऱ्यांची कार्यालये स्थलांतरित करण्यात आली होती. आता इंद्रभुवन इमारतीचे लोकार्पण करण्यात आले मात्र फर्निचरच्या कामामुळे आयुक्तांसह इतर अधिकाऱ्यांचे कार्यालये स्थलांतर प्रलंबित होते.

दिवाळीपर्यंत फर्निचर काम पूर्ण होणार: कारंजे

येत्या दिवाळीपर्यंत फर्निचरसह हायड्रोलिक लिफ्टचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. हे सर्व काम संपल्यानंतर साधारणता: दिवाळीनंतर इंद्रभुवन या वास्तूमध्ये महापालिका आयुक्त, उपायुक्त व सहाय्यक आयुक्त या अधिकाऱ्यांची कार्यालये स्थलांतरित करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिली

दुसऱ्या मजल्यावर राहणार आयुक्तांचे कार्यालय

इंद्रभुवन या इमारतीमध्ये एकूण दोन मजले आहेत. त्यामध्ये तळमजल्यावर महापालिकेचे दोन उपायुक्त यांची कार्यालय राहणार आहेत. पहिल्या मजल्यावर दोन अतिरिक्त आयुक्त आणि दोन सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय असणार आहेत तर शेवटी दुसऱ्या मजल्यावर महापालिका आयुक्तांचे कार्यालय राहणार आहे.

- लक्ष दीपोत्सवाने उजळली भवानी पेठ;

पाच हजार भाविकांना महाप्रसाद वाटप

सुराज्य/सोलापूर

भवानी पेठ, घोंगडे वस्ती येथील जेमिनी सांस्कृतिक व क्रीडा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने माजी सभागृहनेता सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजापूरला पायी जाणाऱ्या व परत येणाऱ्या पाच हजार भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी जेमिनी माता मंदिरासमोर लक्षदीपोत्सव करण्यात आल्याने घोंगडे वस्तीसह भवानी पेठ परिसर लक्ष दिव्याने उजळून निघाला.

पहाटे ५ वाजता रोहिणी नागराज डबरे, संगीता बाबुराव मल्लाडी, गीता गणेश मल्लुरे, मंजुळा सिध्दारूढ बेवीन, राधिका शिवपुत्र मंदकल या पाच दाम्पत्यांच्या हस्ते जेमिनी मातेचे होम हवन, रुद्राभिषेक, महापूजा, महाभिषेक, महाआरती करण्यात आली. पौरोहित्य सिध्दलिंगय्या मठमारी-स्वामी, बाळासाहेब स्वामी यांनी केले. पहाटे झालेल्या महापूजा, विधीच्या सोहळ्यामध्ये परिसरातील नागरिक भक्तीरसात न्हाहून निघाले होते. दुपारी आमदार प्रणिती शिंदे, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरुटे यांच्या हस्ते तुळजापूरला पायी जाणाऱ्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दीपोत्सवाचा शुभारंभ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी पो. नि. राजेंद्र करणकोट, पोलीस उपनिरीक्षक ताकभाते, शशी थोरात, बिपिन पाटील, अप्पी पुजारी, सिध्दलिंगय्या पुराणिक, निंगप्पा पुजारी, बसवराज जाटगल, बंड्यप्पा डोळळे, नरसप्पा मंदकल, सिद्राम तेग्गेळळी, बसवराज भाईकट्टी, म्हाळप्पा करली, निंगप्पा मेलंकल, अशोक जेनुरे, मल्लेशा मासरेड्डी आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी पवन तगारे, नवीन गोटीमुक्कुल, मुदका करली आदी उपस्थित होते.